# हाकारा

वर्ष विसावे ■ अंक पहिला

जानेवारी - मार्च १९९९



# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

स्फूर्तिस्थान / प्रेरणा : *कै. प्रा. गं. बा. सरदार*

## कार्यकारी मंडळ

| | | |
|---|---|---|
| **अध्यक्ष** | : | प्रा. अ. रा. कुलकर्णी |
| **उपाध्यक्ष** | : | वैद्यरत्न भा. पु. नानल |
| **मुख्य सचिव** | : | प्रा. रा. के. मुटाटकर |
| **सह सचिव** | : | श्री. पुरूषोत्तम आगाशे |
| **खजिनदार** | : | डॉ. वि. श्री. कुलकर्णी |
| **सभासद** | : | डॉ. न. शं. देवधर |
| | : | डॉ. विजय भानू |
| | : | डॉ. मिलिंद बोकील |
| | : | डॉ. शं. गो. देवगावकर |
| | : | ॲड. पद्माकर वळवी |
| | : | श्रीमती आरती कौलगेकर |

कष्टकरी जनता, भूषण भारता, वंदन करितो पददलिता !

**महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक**

# हाकारा

## अनुक्रमणिका


| | | | | |
|---|---|---|---|---|
| ♦ | संपादकीय | : | | २ |
| ♦ | आदिवासी आणि नविन आर्थिक धोरण | : | वाहरू सोनवणे | ३ |
| ♦ | अभूतपूर्व कोल संग्राम | : | रा. वि. भुस्कुटे | १८ |
| ♦ | आदिवासीतील कुष्ठरोग निर्मूलन : एक अनुभव | : | गोविंदराव शिंदे | २१ |
| ♦ | देज | : | रायसिंग महाराज | २३ |
| ♦ | कैफियत आदिवासी माणसाची | : | कुसुम अलाम | २६ |
| ♦ | महादेव कोळी | : | रा. वि. भुस्कुटे | २८ |
| ♦ | आपली जलसंपत्ती व आरोग्य | : | पुरूषोत्तम आगाशे | ३३ |
| ♦ | पुस्तक परीक्षण - १ | : | शौनक कुलकर्णी, सचिन अत्रे | ३८ |
| ♦ | पुस्तक परीक्षण - २ | : | सुरूची पांडे | ४० |
| ♦ | राष्ट्रीय पर्यावरण जागृती अभियान १९९८-९९ | : | | ४१ |
| ♦ | कविता - दारूबंदीचे गाणे | : | रायसिंग महाराज | ४५ |
| | आसू ! टिपागड पहाडीतले | : | उषाकिरण अत्राम | ४६ |
| | माही दुनिया बुडाली | : | उषाकिरण अत्राम | ४७ |


वर्ष विसावे :
अंक - पहिला
जानेवारी - मार्च १९९९

**पत्रव्यवहाराचा पत्ता :**
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे - ४११ ००७.
फोन : ५८८७२१९

**संपादक**
रामचंद्र मुटाटकर

**कार्यकारी संपादक**
पुरुषोत्तम आगाशे

**अक्षरजुळणी**
सन ग्राफीक्स,
दत्तवाडी, पुणे ३०.

**प्रकाशक**
रा. के. मुटाटकर
सचिव, महाराष्ट्र मानव विज्ञान
परिषद यांच्यासाठी
असाईन सिस्टीम्स्
६६७, दत्तवाडी, पुणे ३०
येथे छापून पुणे येथे प्रसिध्द केले.

**मूल्य रू. १५/-**

अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी किंवा मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# संपादकीय

हाकाराचा हा अंक वाचकांच्या हाती देताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे. या अंकामध्ये 'आदिवासी आणि नविन आर्थिक धोरण' हा ज्येष्ठ आदिवासी साहित्यिक व विचारवंत वाहरू सोनवणे यांचा प्रदीर्घ लेख आहे. १९९१ साली भारत सरकारने स्विकारलेल्या नव्या आर्थिक धोरणामुळे जागतिकीकरणाचे वारे देशातून वाहू लागले. त्यामुळे परकीय बहुराष्ट्रीय कंपन्यांचा देशात शिरकाव होऊन त्याचे अनेक बरे वाईट परिणाम दिसू लागले आहेत. पेटंटचा कायदा, उदार आर्थिक नीती यामुळे आदिवासी समाज व संस्कृतीवर होणाऱ्या परिणामांचा सोनवणे यांनी सविस्तरपणे आढावा घेतला आहे. लेखातून उपस्थित केलेले मुद्दे खरोखरच विचार करायला लावणारे आहेत.

१९३१ साली छोटा नागपूर भागामध्ये कोल आदिवासींनी ब्रिटिशांविरुद्ध केलेल्या उठावाचे चित्रण 'अभूतपूर्व कोल संग्राम' या लेखातून आपल्याला वाचायला मिळते. श्री. रा. वि. भुस्कुटे यांनी महादेव कोळी जमातीबद्दल अत्यंत उद्बोधक अशी माहिती दिली आहे. रायसिंग महाराज यांनी लिहिलेली 'देज' ही नाटिका वाचनीय आहे.

याशिवाय पुस्तक परिक्षण तसेच उषाकिरण अत्राम व कुसुम अलाम यांच्या आशयघन व भावोत्कट कविता आहेतच.

'हाकारा' चा अंक सर्वसामान्य लोकांना माहितीपूर्ण व मार्गदर्शक ठरणारा आहे. आपल्या प्रतिक्रिया जरूर कळवाव्यात.

**- कार्यकारी संपादक**

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने या नियतकालिकास अनुदान दिले असले तरी नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असतीलच असे नाही.

# आदिवासी आणि नविन आर्थिक धोरण

*- वाहरू सोनवणे*

१ जून १९९१ रोजी राव व मनमोहन सरकारने देशाचे नविन आर्थिक धोरण स्विकारले. देशाच्या विकासाच्या नावाने बहुराष्ट्रीय कंपन्यांना अनिर्बंध प्रवेश देण्यास राव व मनमोहन सिंग सरकार मजबूर झाले.

उदारीकरण किंवा शिथिलीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण ही त्रिसूत्री या आर्थिक सुधार नीतीचा गाभा आहे.

नवे आर्थिक धोरण स्विकारण्यापूर्वी म्हणजे १ जून १९९१ पूर्वी परदेशी भांडवलाला किंवा देशातील त्याचा व्यवहार यावर जी काही बंधने आणि नियंत्रणे होती ती सर्व शिथिल वा रद्द करणे हे उदारीकरणाचे प्रथम वैशिष्ट्य आहे. त्याचप्रमाणे परदेशी मालाच्या आयातीवर ज्या जकाती होत्या त्या मोठ्या प्रमाणावर कमी करणे अशा आयातीवर जे सरकारचे जे बंधन असायचे ते दूर करणे, परकीय चलने नेण्या-आणण्यावरची बंधने काढून टाकणे म्हणजे देशी विदेशी भांडवलदारांना आपला नफा व अन्य कमाई देशाबाहेर नेण्याचा मुक्त परवाना देणे, भांडवली नफ्यावरचे कर कमी करणे, उद्योगात मक्तेदारी वाढू नये व आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण होवू नये, वाढू नये यासाठी कायद्यात केलेल्या तरतुदी रद्द करणे या गोष्टी उदारीकरणात मोडतात. थोडक्यात म्हणजे देशी विदेशी भांडवलाच्या व्यवहारात सरकारचा जो काही हस्तक्षेप होता तो बंद करून त्यांना अनिर्बंध स्वातंत्र्य द्यावे हा या नव्या आर्थिक धोरणाचा आशय आहे.

विदेशी भांडवलावरचे सर्व निर्बंध, नियंत्रण उठवून ''आवो जावो घर तुम्हारा'' अशी वागणूक ह्या नविन आर्थिक धोरणाला मिळाली. परदेशी मालावरच्या आयातीवर निर्बंध उठवून त्याचा लोंढा देशात सुरू झाला. थोडक्यात स्वदेशी परदेशी हा भेद काढून टाकण्यात आला. म्हणजे भारत हा जागतिक भांडवलदारी व्यवस्थेचा एक अविभाज्य छोटा भाग बनून राहील. ह्या व्यवस्थेवर जगातल्या आंतरराष्ट्रीय कंपन्याचे पूर्ण वर्चस्व आहे.

उदारीकरणाने हा देशही त्यांच्या लुटारू कारवायांना खुला होईल आणि त्यांच्या जागतिक व्यवस्थेत भारत देश सामावला जाईल हे आहे जागतिकीकरण ?

ही सुधार नीती अंमलात आणण्यासाठी सरकारने परकीय चलन नियंत्रणाचा कायदा आणि मक्तेदारी नियंत्रणाचा कायदा दोन्ही एव्हाना मोडीत काढले आहेत. आज परदेशी कंपन्या देशात स्वत:चे उद्योग काढू शकतात देशी उद्योग ताब्यात घेऊ शकतात. आपला नफा व कमाई मायदेशात पाठवू शकतात. त्या हे करू शकतात. एवढेच नव्हे तर त्यांनी हे करावे यासाठी राज्यकर्ते निमंत्रण देतात त्यासाठी पायघड्या टाकतात मागतील त्या सवलती देतात आणि त्यांना जनतेकडून विरोध झाला तर दडपशाहीने तो विरोध दाबून टाकतात. एन्रॉन हे याचे ढळढळीत उदाहरण आहे.

गॅट करारावर सह्या करून सरकारने जागतीकरणाचे निर्णायक पाऊल उचलले. त्या करारान्वये भारताने आपला पेटंटचा कायदा प्रगत भांडवलधारी देशाच्या धर्तीवर बदण्याचे मान्य केले आहे. ते आले तर नवी औषधे स्वत:ची वेगळी प्रक्रिया करून उत्पादन करण्याला आज देशी कंपन्यांना जी मुभा आहे ती काढून घेण्यात येईल. नव्या औषधांची मक्तेदारी बहुराष्ट्रीय कंपन्यांकडे

राहील. त्या औषधांचे उत्पादन देशात करावे की ती बाहेरून इथे आयात करावीत त्यांच्या किमती काय असाव्यात हे ठरवण्याचा पूर्ण अधिकार त्यांचा राहील. याचा आमच्या आरोग्य सेवांवर विपरीत परिणाम होईल. तीच गोष्ट शेतीला लागणाऱ्या बियाण्याची. सध्या जगात कोठेही संशोधित झालेल्या बियाण्यावर काही संस्कार करून आपण येथे त्यांची पैदास करू शकतो. उद्या ते बंद होईल. नव्या बियाण्यांची मक्तेदारी बहुराष्ट्रीय कंपन्यांना मिळेल. आणि परिणामी आमच्या शेतीवर त्याचे नियंत्रण प्रस्थापित होईल. आजच ''कारगिल'' सारख्या कंपन्या बियाण्याच्या क्षेत्रात जम बसवून आहेत.

उदारीकरण धोरण अंमलात येवू लागले तेव्हापासून केवळ आर्थिक क्षेत्रातच नव्हे तर सांस्कृतिक व सामाजिक जीवनात अंध:पात सुरू झाले आहेत. राजीव गांधीच्या काळात बोफोर्स प्रकरणाने देशाला हादरा दिला होता. गेल्या ५/६ वर्षात त्याहून अनेकपट अशा भ्रष्टाचार प्रकरणांची मालिकाच लागली आहे. व त्यात राजकारणातील तसेच व्यापार उद्योगाच्या क्षेत्रातील अनेक उच्चपदस्थ लोक गुंतले आहेत. याच काळात धर्म, जाती, प्रदेश यांच्या आधारे देशाच्या ऐक्यावर प्रहार करणाऱ्या शक्ती वाढत गेल्या आहेत. अयोध्येच्या बाबरी मशिदीचा विध्वंस आणि नंतर देशभर उफाळलेल्या भयलाक दंगली याच काळात घडल्या. स्वातंत्र्याच्या सुवर्णजयंतीच्या वर्षीच तलासरीला आदिवासींवर गोळीबार करून मारण्यात आले तर मुंबईत दलितांचे हत्याकांड घडले. महिलांविषयी गुन्हे वाढत चालले आहेत. सती प्रथेचा गौरव झाला आहे. दूरदर्शन सारख्या प्रसार माध्यमातून आणि चित्रपटातून स्त्री जातीला उपभोग्य वस्तूचे स्थान देणाऱ्या संस्कृतीचा फैलाव होत आहे. या सर्व गोष्टींना खुल्या बाजार पेठेच्या धोरणाच्या काळात ऊत आला आहे हा योगायोग नाही.

त्यांची उत्पादने अण्वस्त्रे फेकणाऱ्या क्षेपणास्त्रांपासून तर बॉलपेन्स पर्यंत आणि शीतपेयापासून तर कीटकनाशकापर्यंत उत्पादनाची सर्व क्षेत्रे व्यापून आहेत. अर्थात अशा महाप्रचंड बहुराष्ट्रीय कंपन्यांची सूत्रे अमेरिका, इंग्लड, जर्मनी, फ्रान्स, जपान, स्वीडन या देशातून हलतात.

या कंपन्यांचे महाकाय साम्राज्य जागतिक स्तरावर पसरलेले आहे ते कोणत्याही मार्गाने केवळ नफा मिळवणे व अधिकाधिक उत्पादनावर मक्तेदारी ताबा मिळवणे या उद्दीष्टासाठीच. स्वत:च्या अगर दुसऱ्या देशाचा कायदा, विकास, पर्यावरण, नैतिकता एकूण मानवीमूल्य यापैकी कशाचाही विचार त्यांच्याकडून पैशांच्या भाषेतच केला जातो. जर एखाद्या देशाचे सरकार किंवा राष्ट्रप्रमुख या कंपन्यांच्या हितसंबंधाच्या आड येत असेल तर प्रथम जास्त किंमत मोजून त्यास विकत घेण्याचा प्रयत्न केला जातो. आणि त्यात यश आले नाही तर या कंपन्या अशा व्यक्तीस अगर सरकारला नष्ट करण्यास मागे पुढे पहात नाही याचे जगजाहीर व अमेरीकेने देखील मान्य करण्यात आलेले उदाहरण म्हणजे चिलीचे डाव्या विचारसरणीचे अध्यक्ष ''आयेदे'' यांची १९७६ मध्ये झालेली निर्घृण हत्या. या हत्येमागे पेप्सी या अमेरिकन कंपनीचा व सी.आय.ए. चा हात होता हे आता स्पष्ट झाले आहे.

बहुराष्ट्रीय कंपन्यांचे भागधारक मुठभर भांडवलदार अधिकारी व्यवस्थापक वर्ग यांची सत्ता त्या देशामध्ये आहे. तेथील सर्व राजकीय व सरकारी यंत्रणाच वैचारीक दृष्ट्या या कंपन्यांच्या वर्चस्वाखाली आहेत.

या कंपन्या म्हणजे फक्त व्यापारी संस्था नाहीत तर तंत्रज्ञान, विकास, संस्कृती आणि स्वातंत्र्य या सर्वांवर आघात करणारा तो एक विनाशी पर्याय आहे. या कंपन्यांना स्वत:च्या वर्चस्वाखाली एक संपूर्ण विचारसरणी

देखील निर्माण करावी लागते व ही विचारसरणी आपल्या मालापेक्षा जास्त वेगाने पसरेल याची काळजी घ्यावी लागते. देशातील बुध्दिवंत वर्ग, राजकीय नेतृत्व इतकेच काय पण सामान्य माणसांपर्यंत स्वत:ला मान्यता मिळवावी लागते आणि या कामात भारतातील बडे भांडवलदार, सरकार व उच्चभ्रू वर्गाच्या पाठिंब्यावर या कंपन्या यशस्वी होत आहेत.

बहुराष्ट्रीय कंपन्यांचा सर्वात वाईट परिणाम म्हणजे जाहिरातबाजीच्या जोरावर वाटेल ती औषधे खपवण्याची त्यांनी पाडलेली पद्धत व त्याबरोबर प्रत्येक आजाराला रामबाण औषध आहे असा पसरवलेला भ्रम इतका की जास्त औषधी वापरणे म्हणजे अधिक चांगली वैद्यकीय सेवा म्हणजे प्रगती? असा विचार रूजू लागला आहे. जणू आरोग्य हे फक्त औषधोपचारावर अवलंबून असते चांगले अन्न, पाणी, हवा, सांडपाण्याचा चांगला निचरा, चांगले शैक्षणिक सांस्कृतिक वातावरण हे आरोग्याचे स्तंभ न ठरता औषधाचे ढिग हे आरोग्याचे मुलाधार ठरू लागले आहेत.

खरं म्हणजे ज्या समाजाला कमी आजार आहेत व म्हणून कमी औषधं लागतात तो समाज म्हणजे चांगला विकसित समाज. ही विकासाची या संदर्भातील योग्य कल्पना आहे.

विकास उत्पादनाच्या वजनात मोजायचा की मानवाच्या अत्यावश्यक मूलभूत गरजा, मानवी प्रतिष्ठेला साजेल अशा रितीने पूर्ण होणे म्हणजे विकास ? डोळे झाकून परदेशातून नव्या वस्तूंची आयात करणे, बहुराष्ट्रीय कंपन्या देतील तेच तंत्रज्ञान प्रागतिक समजून वस्तू वापरणे म्हणजे विकास की उत्पादन क्षेत्रात दर्जा, गुणवत्ता, तंत्रज्ञान स्वत: विकसित करून स्वयंपूर्ण होणे, मानवी संबंधाची गुणवत्ता उंचावून देशातील प्रत्येक व्यक्ती खऱ्या अर्थाने स्वतंत्र व समाधानी करणे म्हणजे विकास ? या कंपन्या आपला विकास साधण्याचा दावा करून साधन संपत्तीचा नाश करून अनावश्यक वस्तूंचे भरमसाठ उत्पादन करत आहेत.

या ठिकाणी आपण एक लक्षात घेतले पाहिजे की विकास ही एक आर्थिक जादू नसून, सामाजिक, सांस्कृतिक वास्तविकता आहे. विकासाची स्वत:ची मूल्य व आदर्श असतात. त्याला एक सांस्कृतिक चौकट असते. उत्पादन आणि वितरण याचा निर्णय केवळ आर्थिक नसतो तर निर्णय घेणाऱ्यांच्या सामाजिक, राजकीय अग्रक्रमाचा भाग असतो. तंत्रज्ञानाचे गंभीर सामाजिक व राजकीय परिणामही असतात म्हणून बहुराष्ट्रीय कंपन्या त्यांच्याबरोबर केवळ तंत्रज्ञान किंवा भांडवल आणत नाही तर विकासाचे त्यांचे एक मूल्य त्यांचे काही आदर्श आणतात.

राजकियदृष्ट्या वसाहतवाद जोपासणे, इतर देशांना गुलाम ठेवणे जेव्हा साम्राज्यवाद्यांना अशक्य झाले तेव्हा या साम्राज्यवाद्यांनी एक नवा पैलू जगासमोर आणला. व्यापाराच्या निमित्ताने येवून इतर देशांना राजकिय, आर्थिक गुलाम बनवायची या देशांची ही कुटनीती परंपरागत आहे. इतिहासाकडे नजर टाकली तर लक्षात येईल की इसवी सन १६०० साली ईस्ट इंडिया कंपनी भारतात आली व्यापार आणि फंदफितुरी करून त्याने भारताला गुलामगिरीच्या जोखडात अडकवले. १९४७ पर्यंत आपली भरपूर पिळवणूक करून साहेब परदेशी परतला. आपली स्वायत्तता या कंपनीच्या मुठीत बंद झाली आहे.

१९८५ पर्यंत बहुराष्ट्रीय कंपन्यांना व बड्या भारतीय कंपन्यांना काही उदद्योगधंद्यामध्ये शिरकाव करण्यास परवानगी दिली जात नव्हती. काही क्षेत्रे लघुउद्योगासाठी

राखीव ठेवली होती पण राजीव गांधींनी लघु उद्योगांना दिलेले हे संरक्षण काढून घेण्यास सुरवात केली आणि नरसिंहराव सरकारने तर बहुराष्ट्रीय कंपन्यांना जवळ जवळ सर्वच मुक्त प्रवेश दिला आहे. या कंपन्या प्रत्येक क्षेत्रात घुसल्यामुळे लघु उदद्योग, ग्रामोद्योग, कुटीर उदद्योगावर गदा येत आहे. काही उदद्योग तर बंदच पडत आहेत. यातून बेकारी वाढते आहे. सततच्या बेकारीमुळे वैफल्यग्रस्त आलेले तरूण कोणत्या तरी फुटीर किंवा गुंडगिरी सारख्या अपप्रवृत्तीचे बळी ठरतात. दिशाहीन नावेप्रमाणे जीवन समुद्रात भरकटणारे हे तरूण अतिरेकी मार्गाकडे वळले तर त्यांना मदत करायला अमेरिकेसारख्या देशांची सरकारे तयार आहेतच. ही सरकारे या कंपन्या भारताची अंतर्गत परिस्थिती सतत अशांत अस्थिर राहण्यासाठी प्रयत्नशील असतात. यातून आपल्या देशाचे विघटन होण्याचा धोका वाढतो.

सध्या सरकारला भांडवलशाही चौकट बळकट करायची आहे. दुसरे म्हणजे या कंपन्या वाटेल तेवढा पैसा खर्च करून सरकारी धोरणावर प्रभाव टाकतात. प्रसंगी खासदारांच्या खरेदी विक्रीला मदत करतात. स्वत:चे राजकीय हितसंबंध सांभाळण्यासाठी हे खासदार या कंपन्यांविरूद्ध एक अवाक्षरही काढत नाहीत. या कंपन्याच्या विरोधात पावले उचलली तर आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आपला कर्ज पुरवठा थांबवेल अशी इथल्या राजकारण्यांनी भीती घातली आहे.

परकीय कर्जाचा अफुच्या गोळीप्रमाणे परिणाम होतो आहे. त्याची खरोखर गरज नसली तरी एकदा अफू घेतल्यावर ती नेहमीसाठी आवश्यक वाटू लागते.

परकीय कर्जाच्या बाबतीत भारताची स्थिती अशीच झाली आहे. परकीय कर्ज न घेता आपण अर्थव्यवस्थेची काटेकोर पुनर्रचना केली. स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टीने खंबीर पावले उचलली तर परकीय कर्जाशिवाय आपण नक्कीच खंबीरपणे उभे राहू शकतो पण त्यासाठी उच्चभ्रूंच्या स्वार्थकारणाला तिलांजली देऊन खऱ्या अर्थाने समाजकारण करण्याची गरज आहे. आणि जनसामर्थ्याने ते शक्य असले तरी सत्ताधाऱ्यांना ते नको आहे.

कोणताही समाज आपल्या सामाजिक मूल्यांचा आधार घेऊन आपले जीवन जगत असतो हे जीवन जगत असताना कोणी व्यक्तिगत हित जपत असतो कोणी सामुहिक, सामाजिक हित जपत असतो. त्या नितीमूल्यांवर आधारीत जीवन संस्कृती त्या समाजजीवनाला दिशा देत असते.

आदिवासी संस्कृती मुळात भोगवादी नाही ती पर्यावरण व सजीव सृष्टीशी एकरूप तर आहेच परंतु समता, सामुहिकता, सहअस्तित्व व सहकार्य यावर आधारित आहे. नव्या आर्थिक धोरणाचा या संस्कृतीवर होणारा परिणाम इतर संस्कृतीच्या मानाने नजरेत भरण्या इतका होणार नाही कारण आदिवासींचे अर्थशास्त्र श्रमावर आधारित आहे. शिवाय आदिवासींची जीवन पद्धती ऐवढी एकात्मक आहे की, त्याच्या जीवनाची अंगे वेगळी करता येत नाहीत म्हणून केवळ संस्कृतीवर होणारा परिणाम वेगळा दाखवता येईल असे म्हणता येणार नाही शिवाय नविन आर्थिक धोरण बाजार, व्यापार, नफातोटा भोगवाद व भौतिक विकासासाठी आहे. आदिवासी या भोगवादी संस्कृतीपासून दूर असल्याने नव्या आर्थिक धोरणामुळे नैसर्गिक साधन संपत्तीचे शोषण वाढणार आहे.

ही सर्व आर्थिक संकटे ही राज्यकर्त्या उच्चभ्रू लोकांनी लादलेली आहेत व आत्मविश्वासाच्या अभावामुळे वाढत आहेत आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील विकसित देश आता आर्थिक धोरणामार्फत विकसनशील देशांवर वर्चस्व गाजवण्यासाठी मार्ग शोधत आहेत. विकसित

देशाच्या उत्पादनासाठी बाजार मिळावा म्हणून एखाद्या देशाला कर्ज दिल्याने त्या देशातील उच्चभ्रू लोकांची निष्ठा स्वत:वर असते, देशाशी नसते याचा अनुभव येत आहे. भारत त्याला अपवाद नाही.

आदिवासी मात्र निरनिराळ्या प्रकारे या बाजारू अर्थशास्त्राच्या धोरणाला आळा घालण्यासाठी आंदोलन करत आहेत. प्रत्येक अभयारण्य, धरणे, राष्ट्रीय उद्याने आदिवासींच्या परंपरागात जमिनीवर आहेत. तसेच खनिजे त्यांच्या वस्तीस्थानाच्या जवळपास आहेत व उद्योग वाढीसाठी विकासाच्या नावाखाली आदिवासींना विस्थापित व्हावे लागत आहे. जमिनीशी संबंध आदिवासी आपले अन्न, आरोग्य, शिक्षण, धर्म बाबतचे ज्ञान अनुभवाने मिळवत आले आहेत. जे आदिवासींच्या आश्रयाला आलेत त्यांनी त्यांच्या उदारपणाचा गैरफायदा घेतला. जमीन ही मालकीची, विक्रीची, नफा तोट्याची वस्तू नाही अशी त्याची धारणा होती. कायद्याचा दुरूपयोग व वर्चस्ववादी सामाजिक सांस्कृतिक तत्वांनी त्यांना निराधार केले. तरी सुद्धा आदिवासी आपल्या अस्तित्वासाठी संघर्ष करत जगत असतात. आदिवासींच्या मदतीशिवाय इतर संस्कृती सुद्धा टिकू शकणार नाही, असे मत व्यक्त होऊ लागले आहे. एवढेच नव्हे तर जगात आदिवासी हक्काचा जाहिरनामा प्रसिद्ध झाला आहे. भारतात आदिवासींचे अस्तित्व नाकारले जात असले तरी राष्ट्रसंघात नोंद तर आहेच. शिवाय आदिवासी आपले अस्तित्व प्रकट करण्यासाठी संघटित होत आहेत. आदिवासींना यांची जाणीव झाली आहे की, आपले अस्तित्व टिकवण्यासाठी ज्या सामाजिक तत्वज्ञानाच्या आधारावर आदिवासी संस्कृती आधारित आहे त्याची मुळे एवढी खोलवर गेली आहेत की आदिवासी संस्कृतीवर होणारे आघात हे प्रभावहीन ठरले आहेत.

जागतिकीकरण आणि उदारीकरण किंवा नविन आर्थिक धोरणाचा परिणाम आदिवासी जीवन संस्कृतीवर लगेच दिसत नाही आणि जाणवतही नाही. मात्र कामगार कष्टकरी जनतेवर लगेच जाणवतो आणि दिसतोही. सर्व सामान्य कष्टकरी जनतेवर होणाऱ्या परिणामातून आदिवासींवर होणारा परिणाम वेगळे काढून दाखवणे ही तसे फार कठिण आहे.

हे धोरण बीज रूपाने होते, तेव्हापासून तर आजपर्यंत जसजसे विकास पावत गेले तसतसे कष्टकरी जनतेवर आणि आदिवासी जनतेवर त्याचा परिणाम होत गेला आहे. आपण तो परिणाम त्या दृष्टीकोनातून पाहिला तर आपल्याला दिसेल. हे धोरण सुरूवातीपासून ते आजपर्यंत जे हितसंबंध जपत, आकार घेत गेले तस तसे त्याचा परिणाम जनतेवर, आदिवासींवर होत गेला आहे. अशा पद्धतीने आदिवासी जीवनांवर, संस्कृतीवर होणारा हा परिणाम समजून घेतला पाहिजे.

आदिवासी समाज आदि काळापासून ते आज पर्यंत समुह जीवन जगत आला आहे. आदिवासीत **''लाहे''** म्हणजे मदतीची परंपरा आहे. आजही आदिवासी समाजात कुणा आदिवासीला शेत ओखरायचे असेल किंवा घर बांधायचे असेल तर गावात ''लाहे'' मदत सांगतो. आणि गावातले आदिवासी विना मजुरी त्याचे शेत ओखरून देतात किंवा घर बांधून देतात.

शिकार करायची असेल किंवा शत्रूचा मुकाबला करायचा असेल तरी आदिवासी समुहानेच प्रतिकार करताना दिसतो. एवढेच नव्हे तर खाज्या नाईकच्या नेतृत्वाखाली इंग्रजांच्या विरोधात आदिवासींनी आंबापाणी, ता. शिरपूर, जि. धुळे, महाराष्ट्र राज्य येथे स्वातंत्र्याची लढाई लढली. स्वातंत्र्याच्या या लढाईत आदिवासी स्त्री, पुरूषांच्या बरोबर मुलं देखील सहभागी

होती. याचे कारण आदिवासीचे समुह जीवन, सुख असो दुःख असो आदिवासी सहभागी होत असतो उदा. आनंदाच्या प्रसंगी उत्सवाच्या वेळेस लग्नप्रसंगी आदिवासी समुहाने गातो, नाचतो. आदिवासी हा एक गायक आहे. तो डान्सर असे व्यक्तीगत कौशल्य सांगणारा नसतो. आदिवासीला समुह जीवनात आनंद वाटतो म्हणून तो त्याच्या जीवन मुल्याच्या आधारे आपल्या जीवनाला गती देत असतो विकास करीत असतो आणि हा विकास प्रस्थापित उच्चभ्रु व्यवस्थेला नको असतो म्हणूनच या व्यवस्थेतील स्वार्थी लोक आदिवासी जीवन पद्धतीला जंगली, मागासलेले म्हणून नाना विशेषणांनी हिणवत असतात जेणे करून आदिवासी जीवनाच्या प्रती इतरांना तिटकारा वाटावा व त्यांच्या जीवनाबद्दल व द्वेष करून व्यक्तीप्रधान हितसंबंधाच्याकडे जनतेचा कल व्हावा समर्थन मिळवावा अशा प्रकारे प्रयत्न होत असतो.

आदिवासी समाज ''समुह मुल्याचा'' आधार घेऊन ''जीवन दिशा'' आखत असतो आणि अशा या जीवनाकडे आम जनतेचा कल किंवा सहानुभूती आली तर आपमतलबी लुटारू, स्वार्थी लोकांची दादागिरी संपेल या भितीने जाणीवपूर्वक हे आपमतलबी लुटारू लोक आदिवासींच्या कल्याणाच्या विकासाच्या बाबतच्या वरवरच्या गोष्टी करतात आणि आदिवासींच्या मुलभूत जीवन मुल्याकडे दुर्लक्ष करतात आणि त्यांना व्यक्तिप्रधान शोषणावर आधारलेली वर्चस्ववादी संस्कृती स्विकारायला सांगतात. ऐकले तर आदिवासी किती सुधारले किती विकास झाला असे म्हणून आदिवासींचे तोंड भरून कौतुक केले जाते. आणि ऐकले नाही तर आदिवासी कधीच सुधारणार नाही म्हणून नाना तऱ्हेने हिणवले जाते आणि म्हणून या नविन आर्थिक धोरणामुळे आदिवासींच्या जीवनमुल्यावर घातक परिणाम होत आहे. ह्या मुक्त अर्थव्यवस्थेच्या स्पर्धेच्या जगात गुणवत्ता, कौशल्यांना अग्रक्रम देण्यात येतो. ज्यांच्या अंगी भांडवली गुणवत्ता कौशल्य आहे त्याने या स्पर्धेत उतरावे व आपला विकास करून घ्यावा म्हणून परस्पर सहकार्याच्या पार्श्वभूमीवर विकास न करता एकमेकाला मागे पुढे टाकून इर्षेच्या मस्तीत विकास करावा असा ह्या धोरणाचा उद्देश आहे. या नविन आर्थिक धोरणानुसार आपला विकास म्हणजे व्यक्तीचा व्यक्तीगत विकास असे गृहीत आहे. व्यक्ती व्यक्तीचा विकास म्हणजे देशाचा विकास असे आहे. इथं आदिवासीच्या जीवन दिशा प्रमाणे सामुहिक हित जोपासले जाऊन सामूहिक विकास होईल असे पाहिले जात नाही. ह्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष आहे. ह्या धोरणामुळे आदिवासी मागे राहील कारण जे कौशल्य आणि गुण मिळवायचे असतील तर आदिवासींना त्या पद्धतीची संधी मिळायला हवी. वरील कौशल्य आणि गुणवत्ता मिळवण्यासाठी जर योग्य संधी उपलब्ध झाली नाही तर तो इतरांपेक्षा दुबळाच ठरेल. असमर्थ, अकुशल ठरेल आदिवासी तरूणांच्या ह्या सवलती जर काढून घेतल्या तर तो ह्या स्पर्धेत उतरायला सक्षम होऊ शकणार नाही. ह्या उदारीकरणामुळे त्याला उघड्या डोळ्यांनी दिसेल की आपल्या जीवनात आपल्या पदरात काहीच नाही, तेव्हा त्याच्या मनावर ताण निर्माण होऊन मानसिक विकृती निर्माण होऊ शकेल. आणि मानसिक विकृतीमुळे आदिवासी तरूण हिंसक मार्ग स्विकारू शकतो, गुंडागिरी करू शकतो. बहुराष्ट्रीय कंपन्या देशात अशांतता निर्माण करून आपल्या कंपन्या उभारून भरमसाट नफा कमवू शकतात आणि ह्या कामी हा मानसिक विकृत असलेला आदिवासी तरूण ह्या भांडवली कंपन्यांना उपयोगी पडू शकतो. तेव्हा त्याचे सामुहिक जीवन मुल्य सोडून व्यक्ती प्रधान जीवन स्वीकारून फक्त स्वतःचे हित साधण्यासाठी आपले जीवन जगत राहील. अशी स्थिती निर्माण होऊ शकते आणि हे घातक आहे.

जिथं संपत्तीचा जन्म होतो तिथून शोषणाला सुरवात होते पर्यायाने शोषक शोषित वर्ग तयार होतो. प्रत्येकाचे वेगवेगळे हितसंबंध तयार होतात.

देशामध्ये नविन आर्थिक धोरणामुळे मोठ्या प्रमाणावर बेरोजगार होणार आहेत. या बेरोजगारांना ग्रामीण क्षेत्रात काम मिळत नाही तेव्हा जगण्यासाठी औद्योगिक मोठ्या शहराची वाट धरावी लागते. आणि अशा प्रकारे बेरोजगर आदिवासींचे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर होते. हे स्थलांतरीत लोक, बायको पोरी सकट शहराचा आश्रय घेतात आणि काम मिळवून जगतात. याचे धुळे, जळगांव जिल्ह्याचे आदिवासी गुजरात मध्ये स्थलांतर करतात हे एक मोठे उदाहरण आहे. लाखोंच्या संख्येने धुळे जिल्ह्यातून आदिवासींचे स्थलांतर होत असते. आणि या स्थलांतरामुळे त्या आदिवासींच्या मुलांना शाळेत जाऊन शिकण्याची सोय नसते आणि म्हणून ती मुलं अनपढ असल्यामुळे अनेक सुखसुविधांपासून वंचित राहून जातात. अशिक्षित माणसांच्या वाट्याला जे जे येते ते ते दुःख दारिद्रय, अज्ञान वाट्याला येते.

स्थलांतर झाल्यामुळे गावाशी नाते संबंध असतात ते दुरावतात. सुख दुःखात सहभागी होता येत नाही. आपल्या जीवन पद्धतीप्रमाणे जगता येत नाही. आणि अशा माणसांना गरीबीच्या ताणामुळे, दारू इ. व्यसन जडते. राबून राबून सुख नाही. स्वतःच्या परिस्थितीला कारणीभूत कोण याचा शोध न घेता किस्मतीचे नाव घेत आणि पदरात येईल ते जीवन मुकाट्याने जगत असतो. समाजाच्या मानवी मुल्य, सामुहिक मुल्य विसरून वर्चस्ववादी, शोषणावर आधारित व्यक्ती प्रधान मुल्यावरचे जीवन तो मजबूरन स्विकारतो आणि जगतो. भांडवली जीवन स्वीकारल्यावर ती भांडवली परिस्थिती मानवी जीवन सोडण्यास भाग पाडते आणि आपले जीवन जगताना आपले जीवनमुल्यच बदलतात.

नर्मदा धरण, या धरणामुळे लाखो आदिवासी कुटुंबांचे विस्थापन आणि स्थलांतर झाले आहे आणि होणार आहे.

या आदिवासींना स्वतःची जन्मभूमी व मसानवटी सोडून जावे लागले, जावे लागणार, त्यांच्या पूर्वजांच्या प्रती जी भावना असते ती तुटणार, नातेवाईक सुटणार. त्यांचे देवी-देवता तिथंच सोडून जावे लागणार. थोडक्यात म्हणजे समाजाच्या पूर्ण जीवनालाच कलाटणी मिळते. आदिवासी जीवन व जीवनमुल्य संपुष्टात यायला कारणीभूत ठरणारे, आदिवासी जीवनावर घातक परिणाम करणारे हे परिणाम आहेत. या विस्थापित लोकांना आदिवासींच्या मर्जीने बसवणार नाही तर सरकार जिथं सांगेल तिथं बसावे लागणार. म्हणजे, मिश्र लोकांमध्ये आदिवासींचे पुनर्वसन केले जाणार इतर जातीच्या बरोबर आदिवासींचे पुनर्वसन केले गेले तर इतरांच्या म्हणजे शोषणावर आधारित वर्चस्ववादी संस्कृतीचा प्रभाव आदिवासींवर पडतो आणि आदिवासी त्यांची जीवन संस्कृती सोडून इतरांच्या संस्कृती प्रमाणे जगायला लागतो व व्यवहार करतो स्वतःची जीवन संस्कृती विसरून जातो. इतरांमध्ये आदिवासी नगण्य असले तर आदिवासीला आपल्या जीवनाप्रमाणे व्यवहार करायला न्युनगंड तयार होतो व त्यांच्या जीवन संस्कृतीप्रमाणे जीवनातले व्यवहार करायला सुरूवात करतो. आदिवासीच्या घरात कोणी मेला तर आपल्या रितीरीवाजाप्रमाणे विधी करायला समाज नसतो. मग आहे त्यांच्या प्रमाणे मरण-धरणचा व्यवहार आटपून घेतात. लग्न असले तरी त्याचप्रमाणे व्यवहार होतो आणि आदिवासी सण त्योहार असले तरी त्याचप्रमाणे साजरा करतो. देवही विसरतो आणि इतरांचेच देव स्विकारतो. हा व्यवहार करीत असताना आदिवासी जीवनांचे जीवन मुल्यही विसरतो आणि व्यक्ती प्रधान संस्कृतीत सामावून जातो. हा असा प्रभाव मानवी समाजाच्या दृष्टीने घातक आहे.

आदिवासीमध्ये राजा पानठा, गांडा ठाकूरच्या नावाने गांव दिवाळी करतात. ही दिवाळी साजरी करणार कसे ? पूजा करणारा आणणार कुठून? सोंगाडे आणणार कुठून? त्याच्या व्यवस्थेला लागणारे तरूणांचा संच आणणार कुठून? त्या दिवाळीला लोक कुठून येणार ? थोडक्यात अशा सणांची आठवण करून घ्यायची, सण साजरा करता येणार नाही. त्यासाठी समाज हवा, समाजाची सामूहिक कृती हवी पण ती इथं साध्य होणार नाही. त्याचप्रमाणे इंदल कसे साजरी करणार ? मृत लोकांना पुजतात तर गाव सोडून आले की मसानवटी कोसो दूर असते तिथं जाणार कसे, लग्न कसे करणार, ढोल कोण आणणार, वाजवणार कोण, खिचे जाणार कोण, गाणे म्हणणार कोण? विस्थापनामुळे आदिवासींचे सर्व जीवनच विस्कळीत होऊन उध्वस्त होते.

नवीन आर्थिक धोरणामुळे बहुराष्ट्रीय कंपन्या धडाधड समुद्र किनारे, शेतजमिनी विकत घेऊन त्याचे व्यापारीकरण करीत आहेत. एन्रॉन हे त्याचे ठळक उदाहरण आहे. कोळंबी उत्पादन, पर्यटन, फळबागा अशा नावाखाली जमीनीची खरेदी होऊन स्थलांतराचे प्रमाण तर वाढणार आहे व व्यापारीकरणाने स्थलांतरीतांवर होणाऱ्या उध्वस्ततेची तीव्रता वाढणार आहे.

टीव्ही, व्हिडिओ इत्यादि मनाला वेड लागणाऱ्या प्रचार माध्यमाचा लोकांच्या मनावर मानसिकतेवर एवढा प्रभाव पडतो की, माणूस टीव्ही सोडायला तयार होत नाही. याचा प्रभाव आदिवासींवर इतका होत आहे की खूप.

आदिवासीत राजापानठा - राणी काजळच्या नावाने गांव दिवाळी होत असते या दिवाळीसाठी आसपास गावचे, आणि गावातील लोकांचे नातेवाईक व इतर हजारोंच्या संख्येने जमतात व रात्रभर या गांव दिवाळीत वेगवेगळ्या गावातून आलेल्या सोंगड्या पार्टीचे एका नंतर एक आळीपाळीने नाटक (सोंग) सादर करून उपस्थितांचे भरमसाठ मनोरंजन करीत असे तर गंभीर नाटकही सादर करून वास्तवाचे भान आणून सोडत असे. अशी ही नाटक करणाऱ्यांना एक आणा चार आणे मानधन दिले जात असे. पण हा प्रकार या टीव्ही मुळे सर्व बंद पडून गुण कौशल्य यांची स्पर्धा सुरू झाली आणि ह्या गाव दिवाळीचे व्यापारीकरण होऊन एका विकृत जीवनाला सुरूवात झाली आहे. आताही गाव दिवाळ्या होतात अजूनही नातेवाईकांना दिवाळीचे निरोप जातात, आसपास खेड्यावरचे लोक जमतात. पण नाटकाचे विषय पूर्वी जसे आपल्या जीवनावर आधारीत नाटक असायचे उदा. मध पाडणे, शिकारीला जाणे, दारू गाळणे इत्यादि ते सर्व जवळ जवळ बंद होऊन टीव्ही वर येणाऱ्या सिनेमांची नक्कल, गीतांमध्येही सेक्सी गाणे, नाटकात नाचणारे सिनेमाच्या पद्धतीप्रमाणे डान्स, वेशभूषाही तशीच. आदिवासींच्या भाषा, आदिवासी नाटकाची पद्धत मात्र आदिवासीच. अशा तऱ्हेने नाटकांवर परिणाम झाला आहे. नाटकातही सेक्सी, अश्लिलता यायला लागली आहे. टीव्ही टाईप नखरे करणे, हावभाव करणे असा प्रकार सुरू झाला आहे. हा प्रभाव म्हणजे शोषणावर आधारित वैयक्तिक हितसंबंध जपणाऱ्या संस्कृतीचा प्रभाव आहे.

एवढेच काय पण आदिवासींच्या गाण्यांचा तर्ज (चाल) सुद्धा सिनेमाचा आधार घेऊन रचले जातात. गायले जातात पुढे मागे गाण्यांचा आशय सुद्धा बदलण्याची शक्यता आहे. एवढा प्रभाव पडत आहे.

आदिवासी ब्राह्मण लावून लग्न करत नाही पण टीव्ही सिनेमात लग्न ब्राह्मणांच्या कडून केले जाते. आणि अशा लग्नाला प्रतिष्ठा असते आणि ती प्रतिष्ठा आपल्यालाही

मिळावी म्हणून आता काही लोकांनी ब्राह्मण लावून लग्न करण्याची प्रथा सुरू केलेली आहे. उदा. भांडवलाला जसे मुक्तद्वार झाले तसे प्रसार माध्यमांमध्येही मुक्तद्वार झाले. आज भारतातले पुराणकालीन पुढारलेले समुहसुद्धा या सांस्कृतिक आक्रमणाने भयभीत झालेले दिसतात. आदिवासी समुहात तर ही मोठी सांस्कृतिक दरीच ओसाडण्याचा किंवा त्यातल्या विकृतींना बळी पडण्याचा, मानसिक तणावाला तोंड देण्याचा प्रश्न तयार होतो.

टीव्ही, रेडिओ, व्हिडिओ यांचा असा प्रभाव आदिवासी जीवनावर पडताना दिसतो तो असा-

आदिवासीत आत्महत्या करण्याचा प्रकार नव्हता. कोणी दुसऱ्यांनी हत्या वा खून केला तरच, नाही तर आत्महत्या करून मरायचा प्रकार आदिवासीत नाही. कोणत्याही संकटांना न घाबरता त्याच्यावर मात करून जगण्याचे मूल्य आदिवासी समाज जीवनात असते. आत्महत्या हा प्रकार फक्त आदिवासी पुरूषात नसतो, असे नाहीतर, आदिवासी स्त्रियांतही नसतो.

पण आता टीव्ही, व्हिडिओ इ. च्या प्रकारामुळे आदिवासी स्त्रियांमध्ये आत्महत्या करण्याचा प्रकार दिसायला लागला आहे. सिनेमा बघून नवरा बायकोवर सिनेमाचा प्रभाव पडतो आणि नवरा बायको सिनेमा स्टाइलने वागायला लागतात, जगायला लागतात तेव्हा प्रामुख्याने बायकोच्या चारित्र्यावर संशय घेऊन वेळप्रसंगी बायकोला कबूल करण्यास भाग पाडण्यासाठी नवरा बायकोला मारहाण करीत असतो. या संशयाला आणि मारहाणीला कंटाळून ती त्याची बायको सिनेमाप्रमाणे विष पिऊन आत्महत्या करून घेते. अशा तऱ्हेने आत्महत्या करण्याचे उदाहरण दिसायला लागले आहेत. हाही या धोरणाचाच एक भाग आणि परिणाम आहे.

ब्राह्मण लावून लग्न करण्यामधून आदिवासींवर कसा प्रभाव पडतो.

व्यक्तीप्रधान मूल्य स्विकारल्यावर मी समाजाचे ऐकणार नाही समाजाने माझे ऐकले पाहिजे कारण मी पुढारलेला आहे. म्हणजे पैसेवाला आहे. पैसेवाला झाला तर कमी पैसे वाले कमी दर्जाचे होऊन जातात आणि पैसे वाल्याची नीती म्हणजे स्पर्धा, मनमानी करायची, दादागिरी करायची आणि या दादागिरीच्या जोरावर समाजाला आपल्या म्हणण्याप्रमाणे वागायला भाग पाडायचे. आणि हा दृष्टीकोन आणि ही मूल्य स्विकारून आदिवासीतही काही मंडळी आता ब्राह्मण लावून लग्न करताना दिसतात.

शहाद्यात ब्राह्मण पद्धतीचे एक लग्न मी पाहिले. लग्नाची वरात शहादा शहराच्या गल्ली बोळातून पुढे-पुढे सरकत होती. वरातीच्या पुढे बॅण्ड बाजा वाजत होता. (आदिवासी ढोल, मांदळ, बीरी वाजवतात.) नवरदेव भाड्याचा फेटा बांधून हातात तलवार घेऊन, काळा चष्मा, कुशीत एक लहान बाळ घोड्यावर सवार झाला होता. मिरवणूक चालली होती. मिरवणुकीच्या समोर बँड बाजा वाजत होता. त्या वाद्याच्या तालावर शिकलेली ४/५ विद्यार्थी पोरं डिस्को डान्स नाचत होती. बाकीची सर्व मंडळी गप्पा गोष्टी करीत हळूहळू पुढे, सरकत होते. आणि घोड्याच्या (म्हणजेच नवरदेवाच्या) पाठीमागे बाया हातात टोपल्या घेऊन हळूहळू चालत होत्या. जणू काय एखाद्या मुदर्याला घेऊन जात आहे. हा देखावा (दृश्य) बघून मन अस्वस्थ झाले. आदिवासींचे लग्न असे असते ? मुर्दाड ? नाही. आदिवासींच्या लग्नात ढोलावर थाप पडली तर, तरूण तरूणींच्यात एक चैतन्य संचारते आणि ढोलाच्या तालावर नाचताना रात्र कशी जाते समजत नाही. एवढा जिवंतपणा

असतो परंतु खोट्या प्रतिष्ठेच्या नावाने आता ब्राह्मणी लग्न अशा प्रकारे स्विकारायला लागले आहेत. आणि आदिवासी समाजाच्या लग्नात वापरले जाणारे ढोल, तुर, बीरी, मांदळ, तुतड्या यांना नाकारले जाते त्यांची जागा बँड बाजा घेतो. प्रधान किंवा पुजाऱ्याला नाकारून ब्राह्मणाला स्वीकारले जात आहे. ह्या परिस्थितीला समाज काही ठिकाणी वेगळ्या पद्धतीने विरोध करतो आहे तर काही ठिकाणी हतबल होत आहे. ही आदिवासी समाजाची अवस्था आहे.

उदारीकरण आणि नव्या आर्थिक धोरणाच्या परिणामामुळे आदिवासींची शेती करण्याच्या पद्धती वर मोठा परिणाम होत आहे. या धोरणाच्या दबावाखाली, आता आदिवासीला शेती करणे भाग पडत आहे.

आदिवासी शोषण नीतीच्या विरोधी आपल्यापणाची भावनेतून विकास करणारी आदिवासींची नीती आहे. ही नीती असल्यामुळे पिढ्या न् पिढ्या जंगलात राहून सुद्धा आदिवासीने जंगलाचे कधी शोषण केले नाही. जंगलातून आवश्यक तेवढीच लाकडे तोडली, इतरांसारखे नफ्यासाठी किंवा स्वार्थासाठी किंवा व्यापारासाठी कधीही निसर्गाला ओरबाडले नाही किंवा जंगल नष्ट केले नाही. हाच दृष्टिकोन आदिवासींनी शेती करताना स्विकारला. धरतीला माता मानतो आणि शेती करतो अशी ही पद्धत आजही आदिवासीत दिसते की जमिनीत धान्य पेरायचे असले तरी धरती मातेची पूजा करतो आणि नंतर त्या जमिनीत आदिवासी बीज पेरतो. पीक कापणी करायची असली तरी पूजा करतो. आणि नंतरच पीक कापतो. ही भावना आणि हा दृष्टिकोन ठेवून आदिवासी शेती करतो.

पण आता या नविन आर्थिक सुधार धोरणाने ही भावना व ह्या दृष्टीकोनावर दबाव येत आहे. आणि अशा पद्धतीने शेती करण्याची पद्धतच मोडकळीस येत आहे.

ऐवढेच नाही तर शेती करण्याचे मूल्य काय तर ''माणूस'' माणसासाठी शेती करायचे. नुसते माणूस नाही तर शेतीबद्दल आपलेपणाची भावना ठेवायची. उदाहरण घ्यायचे असेल तर असे-माझे वडिलांचा शेती करताना दृष्टिकोन काय तर आपल्या घरच्या माणसांची गरज काय ? तर दाळ साठी उडद, मूग, तुवर अशी कडधान्ये घ्यायचे आणि खायला धान्य, ज्वार, मका, बाजर, गहू अशी धान्य घ्यायचे आणि कपड्यांसाठी पैसे लागतात तर थोडा कापूस पेरला म्हणजे कापूस विकून कपडे आणि इतर जीवनावश्यक वस्तू विकत घेता येतील म्हणून, हा असा पूर्वीचा दृष्टीकोन. पण आता तसे नाही नविन आर्थिक धोरणाचा परिणाम इतरांवर जसा पडत आहे. तसा आदिवासी शेतकऱ्यावरही पडत आहे. तो म्हणजे त्याचा शेती करण्याचा दृष्टिकोनही साफ बदलून टाकत आहे.

आता नवीन आर्थिक धोरणाचा परिणाम म्हणून आणि एकूणच दबाव म्हणून माझ्या वडीलांच्या भावना आणि दृष्टिकोन बदलून टाकले आहेत. माझ्या वडीलांच्या दृष्टिकोनातून घरातील माणसं आणि त्यांच्या गरजा लक्षात घेऊन कोणते पीक घायचे त्याची आखणी करायचे. पण आता तसे राहिले नाही. आता माणसाच्या गरजा बाजारातून विकत घेता येतील आपल्या शेतीत कोणतेही पैसे देणारी पिक घ्यावे बस. हाच दृष्टिकोन ठेवून अधिकाअधिक उत्पन्न काढण्याकडे कल आहे. अधिक उत्पन्न काढण्यासाठी शेतीत शेणखत वापरत होते आता रासायनिक खतांचा वापर होतो. रासायनिक खत वापरल्याने पहिल्या वर्षी उत्पन रासायनिक खत टाकावे लागते तेव्हाच उत्पन्न येते. अशा प्रकारे रासायनिक खतामुळे जमिनीची प्रत निकृष्ठ होऊन रासायनिक खताचा वापर केला तर पिकच येत नाही. परंतु नविन आर्थिक धोरणाप्रमाणे अधिक उत्पन्न वापरल्याने आणि त्यातून

मिळणारा अधिक नफा हाच निकष लावला जातो. जमिनीची झीज कशाप्रकारे होते ती कशी भरून काढायची याचा विचार नफ्याच्या दृष्टिकोनात बसत नाही. पूर्वी आदिवासी फिरती शेती करत होता याच शेतीला बरेच लोक अविकसीत शेती म्हणायचे. परंतु इथे शेतीकडे बघण्याचा दृष्टिकोनाचा भाग आहे. फिरत्या शेतीचा दृष्टिकोन असा होता की शेतीला विश्रांती मिळावी व नंतर त्याच शेतीतून अधिक उत्पन्न मिळावे. इथं नफेखोरीचा दृष्टिकोन नसतो. तर जमिनीकडे बघण्याची दृष्टी आपलेपणाची असते. नव्या आर्थिक धोरणाच्या तुलनेत हा दृष्टीकोन मागे पडत आहे. आता कोणतेही पीक घ्यायचे असेल रासायनिक खते आणि कीटक नाशके वापरणाऱ्या आदिवासींची संख्या वाढत आहे.

या रासायनिक खतांचा आणि कीटकनाशकांचा औषध फवारणीमुळे अनेक परिणाम शेतीवर, पिकावर आणि त्या उत्पादनाचा वापर करणाऱ्या माणसावर होत आहे. कीटक नाशके रासायनिक खते याचा वापर करून मिळवलेल्या अन्न धान्यातून अन्न खाल्यामुळे माणसांच्या रक्तातही कीटक नाशक औषधातून येणाऱ्या विषाचे प्रमाण वाढले आहे. हे प्रमाण वाढल्यामुळे माणसांना वेगवेगळ्या जिवघेण्या रोगांना बळी पडावे लागत आहे. माणसे आजारी पडलीच तर पुन्हा बहुराष्ट्रीय कंपन्यांनी बनवलेले औषध उपचारादाखल घ्यायचे. अशा तऱ्हेने आदिवासी व इतरांचे जीवन बहुराष्ट्रीय नफेखोर कंपन्यांचे हाती गेले आहे.

आदिवासी जंगलात रहात असल्याने त्यास वनौषधीबाबत बरीच माहिती आहे. कोणी आजारी पडला तर जडीबुटीचा उपयोग करून रोग्याला रूग्णाला, दुरूस्त करीत होते. परंतु आता पेटंट आल्यामुळे वर्षानुवर्ष परंपरागत रितीने वनौषधी आदिवासी वापरत होता तो आता रेडिओ, टी.व्ही. वर होणारा सारखा प्रचारामुळे पूर्णपणे बहुराष्ट्रीय कंपनी निर्मित औषधांवर अवलंबून राहणार आहे. संबधित औषधाचा खरा उपयोग होतो किंवा नाही, मानवी शरीरावर कोणता परिणाम होईल याचा विचार केला जात नाही. यामध्ये आदिवासीचाही बळी गेल्याशिवाय राहणार नाही.

दुसरे असे की, देशाच्या सरकारने २४ डिसेंबर. १९९६ रोजी आदिवासी स्वशासन बाबत कायदा पास केला. त्या कायदद्याप्रमाणे थोडक्यात असे की, गावच्या शिवारात असलेले जंगल, जमीन, पाणी, खनिज संपदा यावर त्या गावच्या आदिवासींचा अधिकार, म्हणजे याचा उपयोग करण्यासाठी ग्रामसभाचा ठराव केल्याखेरीज जंगल, जमीन, पाणी याचा उपयोग कोणालाच करता येणार नाही. तेव्हा कायदद्याची अशी परिस्थिती असताना नफेखोर बहुराष्ट्रीय कंपन्या ह्या ग्रामसभांवर आपले प्रभुत्व स्थापन करण्यासाठी वेगवेगळ्या मार्गाने प्रयत्न करून आदिवासींसाठीचा हा अधिकार हिरावून घेण्याचा धोका नाकारता येत नाही.

पूर्वी आदिवासी शेणखत वापरून जमिनींचे प्रत टिकवून शेती करत होता. तसेच किड्यांवर नियंत्रण करण्यासाठी कीटक नाशक औषधे न वापरता वेगवेगळे प्रयोग करीत होता. उदा. तुर पेरायचे असेल तर त्या तुरीत किंचित प्रमाणात ज्वारीचे बियाणे मिश्रित करायचे. आणि मग तुरीत पेरलेल्या ज्वारीला कणसं आली तर ते कणसाचे दाणे खाण्यासाठी काही विशिष्ट प्रकारच्या चिमण्या त्या ज्वारीच्या ताटावर बसायच्या व दाणे खायच्या दाणे खाता खाता जर त्यांना तुरीवर अळ्या दिसल्या तर त्या पटकन ती आळी चोचींत घेऊन खाऊन टाकायच्च्या. त्या आळ्या खाल्ल्यावर त्या चिमणीला त्या कणसाच्या दाण्यापेक्षा आळीचा मोह लागायचा. अशाप्रकारे अनेक

उपाय आळ्या इ. नियंत्रणासाठी आपल्या पारंपारिक जीवनात आदिवासी करायचे.

आता नविन आर्थिक सुधार धोरणामुळे कीटकनाशक फवारा आला आणि ती माध्यम बाद होऊन गेली आणि काही विसरून गेलीत, त्यांना आठवणही येत नाही. आठवण विसरण्यासाठी तो दृष्टीकोनच नष्ट करून टाकायचा म्हणजे आठवण करायचे कारण नाही.

आदिवासींचे स्वतंत्र असे देवी देवता आहेत. त्यांचे देवीदेवतांवर सारखेच प्रेम, विश्वास, आदर सहकार्य आणि आचार विचार सामाजिक जीवन मुल्यावर आधारित जीवन जगत होते. त्यांचे नियम आणि बंधनही काही अशी कडक नव्हती. आणि अशा प्रकारे वेगळा संदेश देणारा आदिवासी देवदेवता हे इतरांपेक्षा वेगळे आणि स्वतंत्र आहेत पण या सर्व जागतिकीकरणाचा भाग म्हणून आणि नविन आर्थिक धोरणाचा भाग म्हणून त्याच्या मुल्यातही बदल होताना दिसतो.

आदिवासी देव पुजतांना मला मुल द्या. शेतात धान्य पिकू द्या, गांव सुखी राहू द्या, कोणतेही संकट येऊ नये अशा या भावनेने देवाकडे आदिवासींच्या मागण्या व्यक्तीगत न राहता आदिवासी समुहाचे हित लक्षात घेऊन आदिवासी समाजाची देवाकडे मागण्या असायच्या. व्यक्तीगत हित आणि स्वार्थी मूल्य बहुराष्ट्रीय कंपन्या पसरवत आहे व टीव्ही सारख्या प्रसार माध्यमातून प्रचार व प्रसार करत आहे. म्हणून त्याचाही परिणाम आदिवासींच्या धार्मिक जीवनावर होत आहे. आता नवस करताना मला धन दे व्यक्तीगत पातळीवर सुखी होऊ दे. मी निवडणुकीत निवडून येवू दे अशा तऱ्हेच्या मागण्या असतात. आदिवासी देवतांना पैशाद्वारे प्रसन्न करण्याची परंपरा नव्हती, पण नफेखोरांनी ही परंपरा सुरू केली देवावर पैसे दिले किंवा दान पेटीत पैसे टाकले तर देव प्रसन्न होतो. ही नफेखोर स्वार्थी मूल्य आहेत ही आदिवासीमध्ये नव्हती ती शिरकाव करत आहेत.

आणि म्हणून आदिवासी देवापुढे दान पेटी कधीच नव्हती आता ती यायला लागलेली आहे. आदिवासी देवतांची मंदिरे नव्हती. आता दानपेटी ठेवून पैसा गोळा करणे हा दृष्टीकोन ठेवून मंदिरही बांधली जात आहे. आणि ही देवता अधिक पैसा देते म्हणजे दान मिळते त्या देवतावर अतिक्रमण होत आहे. आदिवासी पुजाऱ्याला हाकलून काढून तिथं ब्राह्मण घुसला आहे.

माझ्या मांडणीत बऱ्याच वेळी असे वाटेल की अरे हे सांगतात ते परिणाम भांडवली संस्कृतीचे आदिवासी संस्कृतीवरील आक्रमणाचेच आहेत. मग हवे ते मांडण्याचे कारण काय असे कोणी म्हणेल परंतु एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे की नवे आर्थिक धोरण हे आजच आकाशातून किंवा जमिनीतून आलेले नाही ते भांडवली विकासावर आधीच्या प्रक्रियेतलाच पुढचा टप्पा आहे. व त्या दुष्परिणामाची तीव्रता वाढवणारा आहे त्यासाठी तशा तऱ्हेने दखल घेणे आवश्यक वाटते.

या नफेखोर मूल्य जपणाऱ्या प्रवृत्तीने तर आदिवासी देवदेवता यांचे नाव बदलून हिंदूंचे नामकरण देऊन आदिवासींवर त्यांच्या मुल्यांचा ताबा बसवत आहेत किंवा वर्चस्व प्रस्थापित करत आहेत.

ठाणे जिल्ह्यातील नखमी देवी. ही देवी म्हणजे शेंदूर फासलेला दगड. मंदिर नव्हते पण इथं फार लोक यायचे नवस करायचे खूप गर्दी व्हायची. तेव्हा आपमतलबी वर्चस्ववादी विचार प्रस्थापित करणाऱ्या आणि आपली संस्कृती पुढे रेटणाऱ्या लोकांनी आदिवासी देवीचे नावच बदलवून टाकले ''नखमी'' देवीचे ''लक्ष्मी'' देवी असे

नामकरण केले आणि तिथं त्या दगडांच्या नखमीदेवीच्या ठिकाणी लक्ष्मीची मोठी मूर्ती आणली आणि मंदिरात बसवली व मंदिरात एक दान पेटी ठेवली. त्या दानपेटीत भरपूर पैसे जमतात आणि आदिवासी पुजाऱ्याला तर केव्हाच हाकलून काढले की त्याचा पत्ताच लागत नाही. आता ते मंदीर महालक्ष्मी देवीच्या नावाने ओळखले जाते. नखमी देवी संपुष्टात आली आहे.

याचप्रमाणे याहा भोगी देवी. याहा भोगी देवीच्या यात्रेला लाखोंच्या संख्येने गुजराथ, मध्यप्रदेश आणि महाराष्ट्राचे आदिवासी देवीच्या यात्रेला येत असतात. ही देवी ज्यांना मूल नाही त्यांना मुले देते, अन्नधान्य देते, रडत येणाऱ्याला हसत परत करते अशी भावना लोकांची असते. वर्षानुवर्षे श्रद्धा असलेल्या देवीला विश्व हिंदू परिषदवाल्यांनी ''दुर्गामातेचे'' नाव देऊन हिंदुकरण करण्याचा प्रयत्न केला. परंतु जागृत आदिवासींनी प्रखर विरोध केला आणि त्यांचा डाव हाणून पाडला. हा डाव हाणून पाडला असला तरी देव मोगरा देवीचे मंदिर मात्र बांधले जात आहे. मंदिराचे ट्रस्टी आहेत. अद्याप इथे पुजारी आदिवासीच आहेत पण तिथला एक ब्राह्मण या आदिवासी ट्रस्टीवर आपला प्रभाव जमवण्याचा प्रयत्न करीत आहे. अशा प्रकारे आदिवासीच्या देवी देवतावर इतरांचे आक्रमण होत असून त्यांची नीतीमूल्ये आदिवासी मध्ये पेरत आहेत.

एवढेच नव्हे तर अनेक आदिवासी देवी देवताचे नामकरण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. राजा पानठा, गांडा ठाकूर आणि राणी काजळ यांना आता राजापानठा म्हणजे अर्जुन, गांडा ठाकूर म्हणजे कृष्ण, राणी काजळ म्हणजे द्रौपदी असे सांगून आदिवासी देवदेवताचे नाव बदलवून त्यांची संस्कृती आदिवासींवर लादत आहेत, लादण्याचा प्रयत्न होत आहे. राजा पानठाला अर्जुन मानले तर अर्जुन समजून त्याची पूजा ब्राह्मणी संस्कृतीप्रमाणे विधीप्रमाणे केली जाणार त्यामुळे आदिवासी संस्कृती, आदिवासी विधी विसरवली जाणार आणि आदिवासींना त्यांच्या प्रस्थापित संस्कृती प्रमाणे, मुल्याप्रमाणे जगायला सांगणार म्हणजे त्यांच्या विचार धोरणाची बाजू मजबूत होणार आणि वर्षानुवर्ष आदिवासींवर गरीब कष्टकऱ्यावर राज्य करत राहणार म्हणून राज्य करण्यासाठी यांची अशा तऱ्हेने धडपड असते हे इथं लक्षात घेतले पाहिजे.

आता आदिवासी पावरा जमातीत इंदीराजा मानतात त्याची इंदल करून पुजा करतात. त्याच्याबद्दलही असे म्हटले जाते की इंदीराजा म्हणजे कृष्ण, इंदिराजा हा कुवारा असतो, तरी इंदिराजा कृष्ण कसा होऊ शकतो ? या प्रमाणेच आणखी एक प्रयत्न असा आहे की आदिवासी सुखी व्हावा, धन धान्य पिकावे यासाठी इंदल करतात. तर यालाही असे म्हणायला लागले आहेत की इंदल आणि सत्यनारायण एकच आहेत असे म्हणण्याचे कारण असे की आदिवासींनी इंदल सोडून सत्यनारायण स्विकारावा आणि त्याचीच पूजा करावी म्हणजे त्यांची संस्कृती स्विकारावी. जर ते इंदल आणि सत्यनारायण एकच आहे असे समजत आहेत तर मग त्यांनी पण सत्यनारायणाचा आग्रह सोडून इंदल करावे पण ते तसे करणार नाहीत, आणि अशाप्रकारे अनेक देवदेवता बाबत होत आहेत त्यांची अनेक उदाहरणे आहे.

हाच दृष्टीकोन ठेवून या लोकांनी वेगवेगळ्या मार्गानी आदिवासींना आपल्या धर्मात घेण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणून हा समाज त्यांच्या प्रचाराला बळी पडून कुणी मुसलमान, कुणी हिंदु, ख्रिश्चन झालेला दिसतो. अशा

पद्धतीने आदिवासींच्या सांस्कृतिक जीवनात मोठा बदल होऊन जवळ जवळ ते त्या धर्माचे नीतीनियम आचारविचाराप्रमाणे व्यवहार करतात. असे असतानां सुद्धा काही आदिवासीचे गुणधर्म अजून टिकून आहेत. शिल्लक आहेत पण पूर्ण संपुष्टात आणून त्याचे वर्चस्व गाजवण्याचा त्यांचा प्रयत्न आहे.

आदिवासी जातपात, धर्म भेद मानत नाही म्हणून त्याला आज कोणत्याही धर्माबद्दल तिटकारा नाही किंवा द्वेष नाही. म्हणून तो आज ख्रिश्चनमध्ये दिसतो आणि हिंदुमध्येही दिसतो. एवढेच नाही तर स्त्री पुरूष फक्त धर्म परिवर्तन केले म्हणून दिसतात असे नाही तर आदिवासी स्त्रियांनी वेगवेगळ्या जाती धर्माच्या तरूणांशी लग्न विवाह केलेला आहे आणि आजही नांदत आहे. समाजाने ह्या व्यवहाराला विरोध केला नाही तर त्याला मान्यता दिलेली आहे. आदिवासी मुलीशी लग्न करणाऱ्यांनी आपमतलबीपणाने लग्न करून त्याच्या धर्मात आदिवासी स्त्रीला समावून घेतल्याचेही दिसते.

आपल्याला वाटेल की, काही गरज नसताना ओढून-ताणून आदिवासी देवधर्मावर होणाऱ्या अतिक्रमणाबाबतची चर्चा केली जात आहे. पण प्रश्न तेवढा सरळ आणि सोपा नाही. कारण कोणताही देव किंवा धर्म कोणत्याही समाजापासून तटस्थ नसतो. देवी किंवा देवता किंवा धर्म कोणत्या तरी समाज व्यवस्थेचे मूल्य जपत असतो, संरक्षण देत असतो, म्हणून या देव-धर्माची चर्चा करणे आवश्यक वाटते. आदिवासी देवता व धर्म समानतावादी मूल्यांवर आधारित व्यक्तिप्रधान मूल्यांचा पुरस्कार करतात आणि ती मूल्य जपत असतात. तर इतरांचे देव-धर्म विषमतावादी, वर्चस्ववादी शोषणावर आधारित व्यक्तीप्रधान मूल्यांचा पुरस्कार करतात आणि ती मूल्य जपतात. आणि ही मूल्य नविन आर्थिक धोरणाच्या नीती मूल्यांना पोसणारी आहेत. म्हणून ती मूल्य आदिवासी जीवनाला चिटकू नयेत आणि आपले जीवन भोगवादी जीवनसंस्कृती पासून दूर रहावे यासाठीचा हा प्रयत्न आहे हे समजून घेतले पाहिजे.

प्रस्थापित शिक्षण प्रणाली शोषणावर आधारित भांडवली समाजव्यवस्थेला पोसणारी आहे. नविन आर्थिक धोरणाचे हितसंबंध जपत भांडवलशाही बळकट करीत आहे आणि म्हणून आज देशात मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार, बेकारी, आर्थिक आणि सामाजिक विषमता वाढत आहे. या विषमतेमुळे राजकीय अस्थिरता देशात कायम आहे. असे असले तरी शिक्षणज्ञान घेतलेच पाहिजे. दलित आदिवासी व मागास वर्गातील मूल शिकावे म्हणून सरकार खास सवलती देते. पण उदारीकरण आणि खाजगीकरणाच्या प्रभावामुळे शिक्षणावर मोठा परिणाम झाला आहे. आदिवासींच्या सवलती काढून घेतल्यावर आदिवासी या स्पर्धेच्या जगात खूपच मागे राहिल. आणि मग या मागे राहिल्याचा परिणाम म्हणून आदिवासीचे आर्थिक व सामाजिक जीवन खालावेल आणि भविष्यात आदिवासीला मोठ्या संकटाला तोंड द्यावे लागेल.

मुंबई हे भारताचे औद्योगिक आणि पर्यटनाच्या बाबतीत वैशिष्टचे असलेले शहर. या शहरात देशांतील विदेशातील उच्चभ्रू भांडवलदार व्यापार कामानिमित्त किंवा मौजमजा करण्यासाठी येत असतात. यांच्या चंगळवादी लैगिंक विकृतींची भूक भागवण्यासाठी भांडवली कारखाने काही रेडीमेड माल उपलब्ध करून देत नाही. त्यांच्या लैगिंक विकृती शांत करण्यासाठी आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गातील तरूण मुलींना भौतिक सुखाचे आमिष दाखवून वेश्या व्यवसायाला बळी पाडून घेतले जाते हे देशातील जिवंत उदाहरण

आहे. ते लक्षात घेता या नविन आर्थिक धोरणाचे आदिवासींवर दृष्यस्वरूपात समोरासमोर गंभीर परिणाम होणार आहे.

या धोरणामुळे देशातील आर्थिकदृष्ट्या विकास कामांच्या बाबतीत शिक्षणाच्या बाबतीत मागासलेल्या आदिवासी पहाडी क्षेत्रात (नैसर्गिक दृष्टचा सुंदर क्षेत्रात) जंगलाच्या क्षेत्रात नविन थंड हवेचे ठिकाणे अत्यंत आधुनिक सोयी सुविधांनी युक्त अशी पर्यटन स्थळे, अभयारण्ये विकसित केली जातील. सौंदर्याचा आणि प्रगतीचा दिंडोरा इथल्या भांडवलशाही व्यवस्थेमार्फत पिटला जाईल परंतु या ठिकाणी येणाऱ्या भौतिक सुखे उपभोगणाऱ्या लैगिंक विकृती असलेले भोगवादी लोकांची लैगिंक विकृती अधिकच बळाकवणार आहे. स्थानिक लोकसंख्या बहुल आदिवासी असलेले आदिवासी तरूण मुलींच्या समोर भौतिक सुखाच्या राशी उभ्या करून त्यांच्या आर्थिक कमकुवतपणाचा फायदा घेऊन त्यांना मजबूर करून ह्या भांडवली व्यवस्थेची लैगिंक भूक भागवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर आदिवासी तरूण मुलींना वेश्या बनवले जाईल परिणामास्वरूप समजात असुरक्षितता निर्माण होऊन संपूर्ण आदिवासी समाज जीवन अधोगतीच्या विनाशाच्या आणि मानसिक गुलामगिरीच्या खाईत लोटले जाणार आहे.

नव्या आर्थिक धोरणाचे देशातील आदिवासीच्या आर्थिक जीवनावर तर भयानक परिणाम होणार आहे परंतु अविकसित दऱ्या, खोऱ्यात पहाडात राहणाऱ्या आदिवासींचे मानवी जीवन मुळासकट नष्ट होणार आहे. उदा. तोरणमाळ थंड हवेचे ठिकाण जि. धुळे.

नफ्यासाठी देशाच्या सरकारवर आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी बहुराष्ट्रीय कंपन्या जाणीवपूर्वक प्रयत्न करीत असतात. याचे जिवंत उदहारण दद्यायचे झाले तर झारखंड मुक्ती मोर्चाचे आघाडीचे नेते शिबू सोरेन वगैरे या तीन आदिवासी नेत्यांना भ्रष्टाचाराचा आरोप करून भ्रष्टाचार प्रकरणात अटकविण्यात आल्याचे जगजाहीर आहे.

पर्यायी विकसानितीमध्ये नफा, यंत्रे भांडवल हे केंद्र बिंदू न राहता ''माणूस'' हा विकासाच्या केंद्र बिंदू राहिल. सर्व समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी अनुकुलता निर्माण करण्याच्या दृष्टीने देशातील निसर्गसंपदा व इतर साधनसामुग्री वापरली जाईल. यामध्ये उत्पादनाच्या वजनावर विकास मोजला जाणार नाही. तर मानवाच्या अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण अन्य मूलभूत गरजा मानवी प्रतिष्ठेला साजेल अशा रितीने पूर्ण करायला प्राधान्य दिलेले असेल. निसर्ग संपदा व इतर साधन सामुग्रीचा सर्जनशील व अधिक सम्यक उपयोग होण्यावर भर असेल. बहुराष्ट्रीय कंपन्यांनी दिलेले तयार तंत्रज्ञान आंधळेपणाने न वापरता आपण शेती, उदद्योग नागरी सेवा इ. सर्व क्षेत्रात पर्यायी धोरणे राबवू शकतो.

देश आणि देशाची कष्टकरी जनतेच्या जीवनाला विळखा घालून सर्वांगाने जीवन शोषून घेणारा या नविन आर्थिक धोरणाला सर्व दलित आदिवासी कष्टकरी जनतेने आपल्या जीवनाचा नवा पर्याय मांडून एकजुटीने तीव्र विरोध केला पाहिजे. तरच आपले जीवन आपण सुरक्षित ठेवू शकतो, विकास करून आपले जीवन सुंदर बनवू शकतो. अन्यथा नाही.

धन्यवाद !

*वाहरू सोनवणे*
शहादा, जि. नंदुरबार,
महाराष्ट्र राज्य.

● ● ●

# अभूतपूर्व कोल संग्राम

*- अनुवादक : रा. वि. भुस्कुटे*

कुमांग गांवचा जमीनदार संतापाने बेभान झाला होता. रागाने जमिनीवर पाय आपटीत ओरडून म्हणत होता ''या जंगली लोकांना एवढी हिंमत कशी झाली? माझी गुरे हाकून नेतात म्हणजे काय ? ''मोठ्या गुर्मीने त्यांनी प्रौढी मारली ''माझ्या दोन गाईच्या बदल्यात त्यांना निदान दोन वर्षे वेठबिगारी करायला लावली नाही तर माझे नाव मोहम्मद सांगणार नाही. त्यांना माहित नाही की माझ्या गाईकडे ढुंकुनही पहाणे म्हणजे कंपनी बहादूर यांच्यावरच जणू हात उगारणेच आहे'' आणि बेफिकीर राहून 'जंगली' लोकांच्या चोरीबद्दल त्यांना कशी कठोर शिक्षा द्यायची या विचारात तो मशगुल होऊन गेला.

**ठिणगी पडली**

परतु मोहमंद अली आणि त्याच्या सारख्याच छोटा नागपूरमधील अन्य जमीनदारांचा लवकरच भ्रमनिरास झाला. ११ डिसेंबर १९३१ ला कुमांग वर झालेल्या हल्ल्यानंतर दहाच दिवसांनी २० डिसेंबर १९३१ ला आदिवासींच्या टोळ्यांनी जोरदार हल्ला चढवला. सुमारे सातशे आदिवासी ''लरका हो'' च्या गर्जना करत कुमांगच्या जमीनदारांवर तुटून पडले. इतर चार गावातील जमीनदारांचे वाडे (महाल) त्यांनी उध्वस्त करुन टाकले. इंग्रजांनी आज्ञाधारक सेवक असावेत या हेतूने जमीनदार म्हणून स्थानापन्न केलेल्या या संकुचित व स्वार्थी लोकांना आदिवासींनी चालवलेले हे दंगेधोपे, केलेली छोटी मोठी लूटमार म्हणजे परदेशी ब्रिटिश सत्तेपासून स्वातंत्र्य मिळवण्यासाठी देशात चाललेल्या व्यापक संघर्षाचा एक भाग आहे याची थोडीही जाणीव झाली नाही परंतु धूर्त ब्रिटिशांनी या आकस्मिक उठावाचा खरा अर्थ जाणला. त्यांनी त्याला 'कोल विद्रोह' असे नाव दिले.

छोटा नागपूर आणि जंगल महाल हे सारे क्षेत्र तेव्हा ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकारात होते. बाहेरुन आणून मुसलमान जमीनदार कंपनीने येथील लोकांवर लादलेले होते. ईस्ट इंडिया कंपनीचे ते मुख्य आधारस्तंभ होते. तेथील आदिवासीचे कष्टदायक जीवन सुसह्य करण्याऐवजी हे जमीनदार मनमानी करु लागले. जकात जमिनीची पट्टी व अन्य अनेक कर बसवून ते वसूल करण्यासाठी तेथील आदिवासींवर अनन्वित अत्याचार करु लागले होते.

अनन्वित जुलूम आणि शोषणामुळे आदिवासींनी १९३१ च्या डिसेंबरमध्ये निर्माण झालेल्या असंतोषाच्या स्फोटामुळे ऐन थंडीच्या दिवसातही कंपनीच्या मोठमोठ्या अधिकाऱ्यांना आणि जमीनदारांना दरदरुन घाम फुटला कुमांग येथे पडलेल्या ठिणगीने जणू वडवानल पेटला होता. संघर्षाच्या पहिल्याच टप्प्यात मिळालेल्या विजयामुळे आदिवासींचा उत्साह द्विगुणीत झाला होता आपल्या स्वाभिमानाच्या प्रखर जाणिवेमुळे ते संघटित होऊ लागले. सिंगभूम मधील गांव प्रमुख आणि मानकऱ्यांनी या संघर्षाचे नेतृत्व केले होते.

### शूर विरांची प्रतिज्ञा

२५ डिसेंबर १९३१ ख्रिसमस दिनी संघर्षाचा तिसरा टप्पा सुरु झाला. एका कोल महिलेला रखेल म्हणून ठेवणाऱ्या अत्याचारी जमीनदार याजर अलीला ठार मारले. एकाही कंत्राटदाराला म्हणजे जमीनादाराला जिवंत ठेवायचे नाही, सोनपूर परगण्यामधील प्रत्येक जमीनदारांना ठार मारून जवळच वहाणाऱ्या नदीत हत्यारे धुवायची अशी त्यांनी घोर प्रतिज्ञा केली. जानेवारी महिन्याच्या मध्यापर्यंत आदिवासींनी आपली ताकद अधिक एकवटली आणि जवळ जवळ चार हजार आदिवासींनी गोविंद पुरावर आक्रमण केले. या विभागातील कुंदरला स्वत:चा जीव वाचविण्यासाठी कुटुंब कबिल्यासह पळून जाणे भाग पडले. अशा प्रकारे संबंध तीनशे आदिवासींच्या तुकडीने जमीनदार कालेखान यांच्या गासू गांवावर आणि जमीनदार सैफुल्लाह खान यांच्या संझी गांवावर हल्ला केला. त्यांची घरे उध्वस्त केली आणि पेटवून दिली. कालेखान मारला गेला परंतु सैफुल्लाहखान आपला जीव कसाबसा वाचवून निसटला.

एका आठवड्यानी नवे वर्ष १९३२ सुरु झाले आणि सुमारे एक हजार आदिवासी स्वातंत्र्य वीरांनी कामाग आणि त्या जवळचेच कोरुबुरु गावाच्या जमीनदारांवर हल्ला केला. ३ जानेवारीला गार्गरावर हल्ला चढवला. बेलकुद्रा प्रांत स्वतंत्र्य झाला.

### सेनेची जमवाजमव

ही घटना झाल्यावर मात्र इंग्रज बावरुन संतापले, स्थानिक परिस्थितीचा अहवाल मिळाल्या नंतर पाहण्याचे आयुक्त लॅम्बर्ट यांच्या हुकुमावरुन रामगढ आणि हजारीबाज येथील कुथवर्टच्या नेतृत्वाखालील एक पलटण ठिकाणावर येऊन पोहोचली. परंतु क्रांतीचा तर आगडोंब उसळला होता. गोविंदपूर ठाणे बरकागढ, परगणा आणि सोनपूरच्या उत्तरेकडील सर्व क्षेत्रातील इंग्रजांची सर्व ठाणी नष्ट केलेली होती. २६ जानेवारी १९३२ पर्यंत पालकोटच्या दक्षिणेकडील काही थोडा भाग सोडून जवळ जवळ सर्व छोटा नागपूर स्वतंत्र केले होते. आदिवासींच्या हृदयात स्वतंत्रतेची ज्वाला पूर्णपणे प्रज्वलीत झाली होती आणि कंपनीची फौज त्यांना दाबून टाकण्यामध्ये अयशस्वी होत होती.

इंग्रजी पलटणीचा सेनापती विलकिनसन जादा कुमक पाठविणेबद्दल संदेशापाठीमागून संदेश पाठवत होता. इंग्रजी राज्याच्या भवितव्याबद्दलच्या विचारानें घाबरुन गेला होता. विलकिनसनचे संदेश मिळाल्याबरोबर कलकत्यातील कंपनी प्रमुखांनी कलकत्ता आणि पाटणा येथील छावण्यातून तातडीने फौजा पाठविल्या १७ मार्चला इंग्रजाची पहिली पलटण येऊ पोहोचली. परंतु इंग्रजांना हे लवकरच उमगले की आदिवासींच्या हृदयात पेटलेली स्वतंत्रतेची ज्वाला बंदुका आणि तोफांनी विझवता येणार नाही.

### कोलांचे पारिपत्य करण्याचा ब्रिटिशांचा निर्धार

आपल्या प्रचंड फौजेच्या बळावर मार्चच्या अखेरीपर्यंत ब्रिटिशांनी मध्य आणि उत्तर नागपूरवर आपल्या कळता पुन:प्रस्थापित करण्यात यश जरुर प्राप्त केले. परंतु पूर्वेकडील परगण्यांमधून विशेषत: तमाड आणि बून्द मधील प्रतिकार चालूच राहिला. गुरुहाटू आणि कोटोनगर मध्ये हजारो आदिवासी इंग्रजी पलटणीशी लढायला सज्ज जाले होते. तेव्हा कर्नल बोवेनच्या फौजा आदिवासींची सर्रास कत्तल करत गावे

बेचिराख करत आगेकूच करु लागली ही एक विषम लढाई होती. एका बाजूला बंदुका तोफा ही अत्याधुनिक हत्यारे होती तर दुसऱ्या बाजूला धनुष्यबाण, भाले, कुऱ्हाडी ही जुनी पुराणी हत्यारे होती. इंग्रजी फौजाची आदिवासींच्या गांवात घुसून तेथील झोपड्या जमीन दोस्त करण्यात शेतातील उभी पिके जाळून टाकण्यास आणि बैल, रेडे, म्हशी, गायी ही जनावरे कापून काढण्यात निर्दयपणे सुरुवात केली होती परंतु आदिवासी क्रंतिकारकांनी शरणागती स्विकारली नाही. स्वत:च्या स्वाभिमानाचे रक्षण करण्यासाठी गांव सोडून देऊन जंगलाच्या आणि डोंगराच्या आश्रयाला राहून ब्रिटिश सेनेशी त्यांनी संघर्ष चालूच ठेवला.

२० मार्चला कॅप्टन माल्टबीने राणादिस गांवावर हल्ला केला. सर्व धान्याचा साठा नष्ट केला. शेकडो जनावरे पळवून नेली. हा अनाचार बराच काळ चालू राहिला. क्रांतीवीराना मिळणारी रसद तोडण्यासाठी सर्व मार्ग बंद करण्याचे ब्रिटिशांनी प्रयत्न केले. आदिवासी क्रांतीवीरांच्या कुटुंबाला त्याच्या बायकांना, मुलांना, तरुण मुलींना अटक करुन जेलमध्ये टाकून त्यांचा छळ केला. रसद मिळण्याचे मार्ग बंद झाल्यावर क्रांतिकारकांवर उपाशी मरण्याची पाळी आली, कंपनीने जाहीर केले की ''कोलांचा पूर्ण परिपत्य झाल्याशिवाय कायदा प्रेमी नागरिकांना सुरक्षितता आणि शांती लाभू शकणार नाही.''

**स्वातंत्र्य प्राप्तीसाठीचे खरेखुरे जन आंदोलन**

ब्रिटिश कंपन्याकडील आधुनिक हत्यारांनी सुसज्ज सेनेच्या तुलनेत परंपरागत हत्यारांनी लढणाऱ्या कोलांची बरोबरी होणे शक्यच नव्हते तरीही कोल आदिवासींनी मोठ्या जिद्दीनी आणि शिकस्तीने लढाई करुन ब्रिटिश सेनेची दाणादाण उडवून दिली होती. कोल क्रांतीकारकांच्या बाजूने एकच महत्वाची बाब होती ती म्हणजे ते स्वत:च्या भूमीवर लढत होते आणि त्याच्या भूमीची खडानखडा माहिती त्यांना होती. हा संघर्ष चालू असताना असे काही प्रसंग आले की जेव्हा जणू असे भासू लागले होते की दोन्ही बाजू आता पूर्णपणे थकून गेल्या आहेत. परंतु आदिवासींना याचे श्रेय द्यावे लागेल की त्यांच्यामध्ये असलेल्या शक्तीचा कण आणि कण पणाला लावून ते लढाईच्या मैदानात झुंजत राहिले. त्यांच्या अतुलनीय पराक्रमाचा मोठा परिणाम हा झाला की आदिवासींना पूर्णपणे नमवण्यांत कंपनी कधीच यशस्वी होऊ शकली नाही. त्यांना आदिवासींबाबत सौम्य धोरण स्विकारणे भाग पडले. ब्रिटिश साम्राज्यशाही विरुध्द झालेल्या संघर्षापैकी छोटा नागपूरमध्ये झालेला कोल संग्राम निश्चितच दैदिप्यमान आणि अभूतपूर्व मानावा लागेल. स्वातंत्र्य लढ्याचे जणू हे एक महाकाव्यच होते. कोल आदिवासींच्या या उस्फूर्त संघटित सशस्त्र कडव्या संघर्षामुळे ब्रिटिश प्रशासकांना आदिवासी विरोधी असलेली त्यांची नीती बदलणे तसेच शोषित म्हणून असलेली ह्यांची प्रतिमा बदलण्याचा प्रयत्न करणे भाग पडले. परदेशी सत्ता आपल्या देशातून घालवून लावण्याच्या उद्देशानी केलेले हे एक सुसंघटीत खरेखुरे जन आंदोलन होते.

*('कोल इतिहास की गौरव गाथा' मधील बाहा सौमित्र यांचा लेख ''महान कोल संग्राम'')*

# आदिवासीतील कुष्ठरोग निर्मूलन : एक अनुभव

- *श्री. गोविंदराव शिंदे*

महाराष्ट्रातील आदिवासी भागामध्ये आदिवासींना त्यांचे अनंत प्रश्न त्यांना भेडसावत आहेत. आता आदिवासींसाठी भारत सरकारनं त्यांच्या स्वराज्याचा कायदा केला आहे. त्या कायद्याचा लाभ त्यांना मिळायला पाहिजे. त्या दिशेने त्यांच्या जाणिवा जागृत होतील असं काम करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. आज आदिवासीला धड पिण्याचं पाणी मिळत नाही, स्वत:च घर नाही, घराला गावठाण नाही, मुलांना शिक्षण नाही, आरोग्य रक्षणाची सोय नाही, उद्योगही नाही अशी त्यांची स्थिती आहे.

आता आरक्षणामुळे काही ठिकाणी आदिवासी सरपंच झालेले आहेत. परंतु ते फारसे शिकलेले नसल्यामुळे कामाची माहिती नसल्यामुळे ते नुसते बाहुली बनले आहेत. असा सर्वत्र अनुभव येत आहे. यातून पुढे कसं जायचं याचा विचार सातत्याने होणं आवश्यक आहे.

भारतामधील कुष्ठरोगाचं निर्मूलन या शतकाअखेर करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. परंतु त्यादृष्टीने नेटानं प्रयत्न होताना दिसत नाहीत. जसा देवीचा रोग गेला, प्लेग केला, नारूही संपला आहे तसा हा रोग गेला पाहिजे त्यासाठी सर्वंकष काम करण्याची आवश्यकता आहे.

आम्ही पनवेल तालुक्यात कुष्ठरोग निर्मूलनाचं काम गेली १७ वर्षे करीत आहोत. दरवर्षी आम्हाला २५० नवीन कुष्ठरुग्ण मिळतात. पनवेल तालुक्यात १८५ गावे आहेत त्या गावात जावून स्लाईड शो दाखवून प्रत्येक माणसाला तपासून असे ५ हजार रोगी शोधून काढले, व त्यांना औषधोपचाराखाली आणलं. त्यापैकी ४५०० रोगी पूर्ण बरे करण्यात आले, आहेत. तरीही २५० रोगी नवीन सापडतात हे कुठून येतात त्याचा शोध आम्ही घेऊ लागलो त्यावेळेला आदिवासी वस्ती असलेल्या भागातून हे रोगी अधिक प्रमाणात मिळतात असं लक्षात आलं. पनवेल तालुक्यात आदिवासींच्या ७० वाड्या आहेत. आदिवासी दिवसा घरी सापडणं कठीण, उन्हाळ्यात गावात सापडणं कठीण. कारण त्याला जगायला कुठंतरी जावं लागतं म्हणून त्याला पावसाळ्याच्या सुरवातीला तो आपल्या गावी आल्यानंतर तपासायचं असा आम्ही निर्णय घेतला. पहाटे, रात्री आदिवासी वाड्यांवर जावून आमचे डॉक्टर, लेप्रसी टेक्निशिअन व सामाजिक कार्यकर्ते काम करू लागले. डोंगरात फिरून नवीन रोगी शोधून काढू लागले. कुष्ठरोग म्हटला की भिती वाटते. परंतु आदिवासी समाजाला त्याची भिती कधीच वाटत नाही. आदिवासी समाज इतर कष्ट सहन करतो तसा हा रोगही सहन करतो. रोगग्रस्त स्थितीतच तो वावरत असतो. या ७० वाड्यांतून ९२ लोक शोधून काढण्यात आले. आता हे सर्वजण औषध घेऊन बरे होणार याचा मोठा आनंद वाटला व खूप समाधान वाटले.

एखादा रोगी सापडला तर त्याला सहा महिने ते दोन वर्षे नियमित औषध घ्यावं लागतं. आता हे आदिवासी लोक पावसाळा संपल्यानंतर दूर कोठेतरी जातील मग

त्याचं औषध तुटेल म्हणून त्यांना लवकर बरं करण्याच्या दृष्टीने कोणतं औषध देता येईल याचा विचार आम्ही मंडळी करू लागलो. प्रसिद्ध कुष्ठरोग तज्ञ मुंबईचे डॉ. आर. गणपती यांची भेट घेण्यात आली. त्यांनी सांगितलं आता एक नवीन औषध निघालं आहे ते २८ दिवस नियमित सकाळी अनशेपोटी घेतलं तर २८ दिवसात रोगी बरा होतो. औषध महाग होतं प्रत्येक रोग्याला २८ दिवस औषध द्यायचं तर दोन हजार रुपये लागतात. तरी लोकांकडून पैसे मिळवून हे औषध आदिवासींना आम्ही देण्याचा कार्यक्रम सुरु करण्यात आला. प्रथम आम्ही त्यांना आमच्या शांतिवनात येवून हॉस्पिटलमध्ये दाखल व्हायला सांगितलं बऱ्याच लोकांनी मान्य केलं परंतु प्रत्यक्ष कुणीच आलं नाही त्यामुळे त्यांच्या घरी जावून औषध द्यायचा कार्यक्रम ठरवावा लागला. २८ दिवस तो भार पडला आणि रुग्ण रोगमुक्त झाले. डॉ. गणपती यांनी स्वत: येवून सर्वांना पाहिलं त्यांनीही खूप समाधान व्यक्त केलं. आता आम्ही वारंवार या आदिवासी वाड्यांचा सर्व्हे सुरु केला आहे. त्यांच्यातून जे नवीन लोक सापडतात त्यांना लगेच औषधोपचाराखाली आणलं जातं व हे महिन्यात बरे होतात.

आमचं हे काम पाहून सरकारनंही आपल्या आरोग्य खात्याला कळविलं की, शांतिवनामध्ये जसं काम चाललेलं आहे तसं काम इतर जिल्हयांच्या आदिवासी भागामध्ये करण्यात यावं आणि त्याची सुरवात आता झाली आहे. आदिवासींच्या अनेक अडचणी व प्रश्न आहेत. त्यामध्ये एका छोट्याशा प्रश्नाला मदत करता आली त्यामुळे आनंद झाला.

*- श्री. गोविंदराव शिंदे*

शांतिवन, पो. नेरे, ता. पनवेल, जि. रायगड

● ● ●

# कुपोषण

**डी. बी. मंडाले गुरुजी**

मेळघाटमध्ये वास्तव्याला राहतात
आदिवासी कोरकू अडाणी,
काही खेडे गाव वाल्यांना
स्वच्छ पिण्यास मिळत नाही पाणी ॥१॥

सुकदा, स्वल्पाहार लहान मुलांच्या
भाग्यात नाही वाट्याला,
वाटप करतात सुकदा,
एकदोन बोरी नावाला
शंभर, दोनशे बोरीची
चोरी करून करतात घुसखोरी ॥२॥

काही ठिकाणी आहे
नावाला दवाखाना
तेथे नाही औषधीचा ठिकाणा
शासकीय नियंत्रण नाही,
वसतीगृह शिक्षणांला
सर्व शासकीय,
योजना गेल्या लयाला ॥३॥

# देज

- *रायसिंग महाराज*

पात्र :- सोन्या भिला त्याची पत्नी, मुलगा, मुलगी, सून, फुलाबाई, रामा, जिन्या, भिल्ल मंडळी नाईक प्रधान इत्यादी

(रामा, जिन्या, भिल्ल मंडळी बाहेर गावाहून भिलाटीत येतात)

रामा, जिन्या, भिल्ल मंडळी :- राम राम मंडळी

भिल्ल मंडळी, नाईक प्रधान :- राम राम पाहुणे, पाणी बिणी घ्या, कुठे येणे केले ?

रामा मुलगा, जिन्या, भिल्ला मंडळी :- आम्ही मुलगी पायला आलो. आमच्या मुलासाठी मुलगी दाखवा !

नाईक प्रधान :- आहे की मुलगी सोन्या नाईकाची. (मुलगी दाखवतात)

रामा मुलगा, जिन्या नाईक, भिल्ल मंडळी :- वा !! मुलगी लई छान की, पटली की आम्हाला. पण ? तुमच्याकडे देज (मुकाडा) (घासडी) काय हाय ?

नाईक प्रधान :- आमच्या वस्तीत देज (मुकाडा) फारच कमी आहे, तो म्हणजे दोन हजार रुपये.

जिन्या नाईक भिल्ल मंडळी :- दोन हजार रुपये !!

रामा मुलगा, जिन्या नाईक :- अरे बापरे दोन हजार रुपये देज ? भिल्ल मंडळी, आमच्याने नाही झेपणार ?

चला पुढच्या वस्तीत.

(उठू लागतात)

नाईक प्रधान :- आहो पाव्हनं बसा की, आम्ही तुमची थट्टा केली. खरोखर आठशे एक्कावन रुपये देज आहे. तोबी या वाढत्या महागाईमुळेच झाला. याच्या आधी एकशेएक्कावन पासून ते पाचशे एक्कावन पर्यंत होता. तो आता आठशे एक्कावन रुपये झाला आहे.

नाईक प्रधान, भिल्ल मंडळी :- वर मुलाचे नाव, गोत्र काय आहे ?

भिल्ल मंडळी :- रामा जिन्या सोनवणे, सोनवणे गोत्र आहे.

नाईक प्रधान :- बरोबर आहे. त्या वधु मुलीचे नाव फुलाबाई सोन्या ठाकरे आहे. टाका की झोन्या !! बंदोबस्तात आले आहेत ना ? वधुला साडीचोळी, सायकळाचे सर्व सामान आणले आहेत ना ?

भिल्ल मंडळी :- सर्व सायकळाचे सामान आणले आहे ? फक्त नागिणचे पाच पान व दारूची बाटली नाही आणली पोलिसांच्या धाकानं !!!

(मामाकडे सुट्टीत आलेला भिल्ल विद्यार्थी तेथे येतो.)

विद्यार्थी :- बरं !! झालं बाटली आनली नाही ते, आता जुन्या रूढ्या सोडा (परंपरा) जग कुठे चाललयते !

नाईक प्रधान :- जग चालले चंद्रावर व त्यांच्या मुली चालल्या स्मशानात. आपल्या नाही पाठवायच्या स्मशानात. नव्या रूढीने त्यांचे शेतीवाडी व मोठे मोठ्ठाले घर हवेतल्या आहेत ते लोक चटकन विकून, शेत गहाण ठेवून वर मुलाच्या मढ्यावर घालतात आपल्याला राहचला पुरेशे झोपडे नाही, घरात (झोपड्यात) खायला अन्न-धान्न नाही व अंगाला पुरेसा कपडा नाही तर असल्या तुमच्या सुशिक्षित पोरांचे ऐकून आमच्या

भिल्लाटीची होळी करुन घेऊ काय ? आमच्या मुलीचे लग्न होतील काय ?

विद्यार्थी :- नाही हो काका, मामा मी फक्त दारूबद्दल बोललो. तेवढे वगळता आपल्या चालीरीती फारच चांगल्या आहेत आजच्या युगात तरी त्या फारच योग्य आहेत. आपल्या मुलीला वराकडून देज (मुकाडा) देतो. आपले पूर्वज फारच विदूवान होते. त्यांना भविष्यकाळाची जाणीव होती. लग्नात वराकडून वधु मुलीला देज म्हणून पैसे देऊन त्याच पैशात वधु मुलीचे वडील लग्नकार्य उरकून घेत. त्या मुळेच एवढ्या गरिबीतून भिल्ल मुले मुलीचे लग्न होतात.

नाईक :- विद्यार्थी भाचा अगदी सुधरूण बोलला, फक्त पूर्वजाचं एकच चुकलंय !

विद्यार्थी :- पूर्वजांचे महान उपकार आहेत मामा त्यांची चूक जी आता आपण दुरुस्त करून टाकायची यामुळे भिल्ल मुले मुलींचे लग्नातील येणारे अडथळे, भांडणे यांना आळा बसेल.

प्रधान :- दारूपायी लग्नात भांडणे होतात एकमेकाबद्दल एकात्मीकता रहात नाही एकमेकाबद्दल घृणा निर्माण होते व पैशाची उधळपट्टी होते व समाजाला खालचा दर्जा प्राप्त होतो.

नाईक :- तर !! आजपासून सोडा त्या दारूला. दारूपायी आपल्या भिल्ल समाजाचा नाश झाला आहे, दारूपायी इज्जतीचा नाश, पैशाचा नाश व शरीराचा नाश. दारूमुळेच आपण आळशी बनलो व बुदि्धचा ऱ्हास होऊन मुलबाळ उपवाशी मरायला लागली असून आता सरकारी दारूच्या दुकानांमुळे अबकारी व पोलिसांनीसारखी भिलाटींची झडती चालू केली आहे. त्यामुळे आपण भिल्लांना मजुरीकरीता आठ महिने गुजराथ राज्यात स्थलांतराची पाळी आली आहे.

भिल्ल मंडळी प्रधान :- तेथेही कारखानदारांच्या भ्रष्टाचाराला ऊत आला आहे.

विद्यार्थी :- याचे कारण निरक्षरता. (अशिक्षित) कारण आपण लोक शाळा शिकला नाहीत व आपल्याला वाचता लिहिता येत नाही, या अडाणीपणाचा फायदा साक्षर लोकांनी घेतला.

प्रधान :- तू बरोबर बोललास. याच्यापुढे, आम्ही जरी निरक्षर राहिलो पण आमच्या मुलामुलींना शाळेत पाठवून त्यांना साक्षर करणार म्हणजेच पुढील भावी पिढीला मानाप्रमाणे व ऐश आरामाने जीवन जगता येईल.

नाईक :- शिकेल तो टिकेल बरं. असो मुलीचा सायकळा झाला आता लग्न तारीख निश्चित करून लग्नाला सुरूवात करू या (विवाह मुहुर्त - मिती चैत्र शु ११ शके १९०१ रोजी गुरुवार ता. १६-४-९२ रोजी स्टँ. टा. १२-३० वा. घटीक हच्या सुमुहूर्तावर करण्याचे योजिले व त्याप्रमाणे लग्नाला सुरवात करतात.)

(रामा नवरदेव भिल्ल मंडळी नवरदेवाचे वऱ्हाड घेऊन येतात ढोल, पावरीची वाद्य वाजू लागतात, नाईक, प्रधान, व नवरीचे आई, वडील भाऊ इत्यादी सर्व मांडवात हजर रहातात व भिल्ल पंच मंडळी, नाईक प्रधान यांच्या हस्ते भिल्ल परंपरेप्रमाणे लग्न लावण्यास सुरवात करतात.)

प्रधान :- नवरा नवरी मांडवात पाटावर बसवा व नवरा नवरी यांनी ज्याच्या त्यांच्या गळ्यातील काकण पोळते म्हणजेच सुतीहार घेऊन सावध रहा.

नाईक :- मध्ये कळस (नारळ, नागीनचे पाच पान व तांब्याचे लोटीत कळस) मांडा व पाच खारीक, पाच सुपाऱ्या ठेवा ताट आणा, त्यांत कुंकू, अक्षदा आणा, सर्व आले. (मंगल ढोल, पावरी वाद्य घेऊन सज्ज रहा. भिल्ल परंपरा अष्टके बोलून)

प्रधान :- बारा तिसचा टाइम झाला नवरा मुलगा व नवरी मुलगी एकमेकांच्या गळ्यात सुती हार घाला.

नाईक :- नवरा मुलीच्या गळ्यात काळी पोत (मंगळसूत्र) बांधा.

(वरीलप्रमाणे सांगितले व नवरा नवरी यांनी एकमेकांच्या गळ्यात सुती हार व मंगळसूत्र बांधले व लग्न लागले गेले.)

मंगल ढोला पावरीचे वाद्य वाजू लागले व दोघे बाजूचे भिल्ल मंडळी भिल्लनाच नाचू लागले व भिल्लीण बाया लग्नाचे गाणे गाऊ लागले.

### गाणे

लाडातुले बाशिंग पेहणाऊ रंगलाई लाई
रंगलाई लाई मोत्या कयालाई बिजलीना तेजवर
काडा नजर लाई ।।धृ।।
लाडा तुले हयदी पेनाऊ रंगलाई लाई
रंगलाई लाई मोत्या कयालाई बिजलीना तेजवर
लाड नजर लाई ।।१।।
लाड तुले चिक्सा पेनाऊ रंगलाई लाई
रंगलाई लाई मोत्या कया लाई बिजलीना तेजवर
लाड नजर लाई ।।२।।
लाडा तुले पोयता पेनाऊ रंगलाई लाई
रंगलाई लाई मोत्या कया लाई बिजलीना तेजवर
लाडा नजर लाई ।।४।।
लाडा तुले सालु पेनाऊ रंगलाई लाई
रंगलाई लाई मोत्या कया लाई बिजलीना तेजवर
लाडा नजर लाई ।।५।।
लाडा तुले सदरो पेनाऊ रंगलाई लाई
रंगलाई लाई मोत्या कया लाई बिजलीना तेजवर
लाडा नजर लाई ।।६।।
लाडा तुले सुट पेनाऊ रंगलाई लाई
रंगलाई लाई मोत्या कया बाई बिजलीना तेजवर
लाडा नजर लाई ।।७।।
लाडा तुले बुट पेनाऊ रंगलाई लाई
रंगलाई लाई मोत्या कया लाई बिजलीना तेजवर
लाडा नजर लाई ।।८।।
रंगलाई लाई मोत्या कया बाई फुलानवरीला
तेजवर लाडा नजर लाई ।।९।।

प्रधान व गावातील भिल्लमंडळी :- काहो सोन्या वन्या ठाकरे तुम्हाला (नवरी मुलीचे बाप) देज पूर्ण मिळाले काय?

सोन्या ठाकरे :- होय, मला नवरदेव रामा जिऱ्या सोनवणे यांच्याकडून कुंकूच्या वेळी पाचशे रुपये व लग्नाच्या अगोदर तीनशे एक्कावन रुपये एकूण मला देजचे आठशे एक्कावन रुपये पूर्ण मिळाले आहेत.

प्रधान, नाईक भिल्ल मंडळी :- मग! चला नवरदेवाचे नवरीसह वऱ्हाड वाटे लावू या.

भिल्लन :- व्याहीभाऊ व व्याही बहीण नवदिवसाचे मुळ केले आहे. नवदिवसात मुळ घेण्यास या हं!

(मुलीची आई व तिची सून हच्या व्याहीणींना एकमेकांचे पाया पडून भेट घाट करून)

भिल्लीण व सून :- नवदिवसात येतो हं मुळ घ्यायला.

भिल्लन भिल्ल :- या ऽ ऽ या !!

**रायसिंगमहाराज**
बळसाणे, ता. साक्री, जि. धुळे

● ● ●

# कैफियत आदिवासी माणसाची

*- सौ. कुसुम अलाम*

साऱ्याच क्षेत्रात उपेक्षित राहणाऱ्या आदिवासी माणसाची ही कैफियत. अनेकांच्या अथक प्रयत्नांनी बलिदानांनी या देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. भारत स्वतंत्र झाला. या देशाने स्वातंत्र्याची सुवर्ण जयंती साजरी केली. त्यावेळी या देशाची परिस्थिती आजची परिस्थिती सर्वसामान्य कष्टकरी, कामकरी या देशातील गरीब जनता दलित आदिवासी यांची स्थिती काय आहे ?

अत्यंत दुर्गम भागात राहणारा हा आदिवासी माणूस ह्याला जसा जंगलाच्या दाटीने सूर्यप्रकाश दिसला नाही तसाच सत्तेच्या खुर्चीवर बसलेल्या माणसाचा स्वार्थ त्याच्या भोळ्या मनाला उमगला नाही हा माणूस आज इतरांच्या तुलनेने कोणत्या स्थानावर आहे ? याचे अवलोकन 'प्रजासत्ताक' दिनाच्या निमित्ताने करावे असे प्रामुख्याने वाटते. ज्ञानाचे डोळे नसलेला हा माणूस आजही अन्न-वस्त्राशिवाय स्वाभिमान शून्य जिणे जगतो आहे. ही केवढी विटंबना त्याच्या आयुष्याची ? या देशाला स्थिर सरकार देण्याची घोषणा करणाऱ्या सरकारला ह्या भारतमातेच्या सुपूत्राचे विस्मरण का होते? या माणसाला अज्ञानाच्या अंध:कारात कायम ठेवून आपला स्वार्थी हेतू साध्य करायचा आहे हेच त्यावरून सिध्द होत नाही काय ?

ह्या माणसाला, स्वातंत्र्य, प्रजासत्ताक, गणराज्य, संविधान, लोकशाही निवडणूका, मतदान याचा सुध्दा अर्थ कळत नाही. एवढेच नव्हे तर हा देश, ही सत्ता, हे सरकार हे सारे काय आहे याची सुध्दा त्याला जाण नाही याचे कारण काय ? ह्या माणसाच्या अस्मिता जागृतीसाठी कुठल्याही सत्तालोलुपांनी वा अनेक पुरस्काराचे धनी असलेल्यांनी कधीही प्रयत्न केलेला दिसत नाही.

हा माणूस शहाणा झाला तर? तर आपले कारस्थान नक्कीच उघडे पडेल ही त्यांची भीती रास्तच नाही काय ? हया अशा, स्वार्थी, लुटारुंच्या हाती त्यांच्या कात्रीत हा भोळा माणूस सापडलेला आहे. त्याच्या आदिवासी नामाचा अनेक गैरमार्गासाठी उपयोग होताना दिसतो आहे. त्याला वनवासी करू पाहणारांची टोळी सक्रिय झालेली आहे. दुसरीकडे नक्षलवादाने सारे वातावरण भयग्रस्त आहे. हिंसाचाराने सारा आदिवासी माणूस होरपळून निघत आहे. बंदुकीच्या धाकाने आली दंडुक्याच्या धाकाने या माणसाला नमवू पाहत आहे. आदिवासी तरूणांना अशा प्रकारे नागवल्या जात आहे. आदिवासी माणसाचे भविष्य असे कुस्करल्या जात आहे.

बळी गेलेल्या तरूणांच्या विधनांची कैफियत तर काही औरच आहे. आपले कुटुंब शहरातच ठेवून नोकरी निमित्त या भागात आलेला एक वर्ग त्यानेही येथील अज्ञानाचा भरपूर गैरफायदा घेऊन भोळ्या माणसाची फसगत केली आहे. स्त्रियांवर अत्याचार होतच आहे. येथले दारिद्र्य बरेचदा लाल हिरव्या नोटांना शरण जातानाही नाइलाजाने पाहावे लागते आहे.

पूर्वीच्या काळी हल्लेखोर लोक आदिवासी स्त्रियांना पळवून नेत असत. त्यामुळे आपली स्त्री ओळखू यावी म्हणून स्त्रिया अंगावर गोंदवून घेत ती पूर्वीची असुरक्षित स्त्री आणि नक्षलवाद्यांच्या बंदुकीच्या धाकावर पळवून नेऊन वापरली जाणारी आजची स्त्री खरंच आदिवासी स्त्री सुरक्षित आहे ? जागतिक स्तरावर स्त्रियांचे प्रश्न मांडणाऱ्या स्त्रीमुक्ती चळवळी आणि ते कार्य करणारे

कार्यकर्ते त्यांनी ह्या स्त्रियांचे प्रश्न जगासमोर मांडले ? अल्पवयीन आदिवासी मुलींचे बेपत्ता होणे कुणाच्या हृदयाला घाव घालतात ? त्यांचे दु:ख, त्यांच्या आप्त स्वकियांची दु:खं कुणाच्या मनाचा ठाव घेतात ? कुणाचे ऊर फोडतात ?

एअरकंडीशन मध्ये राहून मनोरंजनाच्या दुनियेत रमणारे साहित्यिक जेव्हा आदिवासी माणसाचे दु:ख, त्यांच्या व्यथा वेदना रंगवतात खरंच आदिम वेदनेशी ते प्रामाणिक असतात ? खरे तर ते आदिवासी साहित्याचा अभ्यास करून आदिम दु:खाचे संदर्भ शोधतात.

भामरागडच्या अलिकडे असलेल्या 'हेमलकसा' येथील लोकबिरादरी केंद्र अशा लोकांचे पर्यटन केंद्र होऊन बसले आहे. आदिवासी माणसाला त्यांनी सर्कशीतील नोकर बनवून टाकले आहे. आदिवासींचे रेलॉ हा त्यांचा चवीचा मनोरंजन असतो तर फोटाग्राफी हा फावल्या वेळचा छंद होऊन बसतो. या माणसाची झोपडी त्यांचे कुतुहल जागे करते.

आदिवासी माणसाची 'गोटुल' वर भारीच श्रध्दा. दिवसभर श्रमलेले, थकलेले शरीर अपार कष्ट करणारे जीव पोटात चारा टाकल्यानंतर या 'गोटूल' मध्ये येतात. येथे तरूण तरूणी वृध्द स्त्री-पुरुष सारेच सहभागी होतात. हा माणूस कुणाचेही वाईट न चिंतता, चाहाड्या, चुगल्या न करता एकमेकांच्या सुखदु:खाच्या, भावी जीवनाच्या चर्चा करण्यात रमतो. अनेक अडचणींवर सामुहिक विचार होतो. मार्ग सापडतात. नैतिक मुल्यांचे शिक्षण या ठिकाणी दिले जाते. सारे व्यवहार संस्कृतीची मूल्ये जोपासून केले जातात. परंतु, एअरकंडीशन मध्ये बसून अप-टू-डेट राहणारा माणूस या गोटूलला व्यभिचाराचं रूप देवू पाहतो आहे. आदिवासी संस्कृतीची चेष्टा करतो आहे.

आदिवासी शिक्षणाबाबत तर सारा सावळा गोंधळ अनुदानित शाळेची स्थिती तर अवर्णनियच. वेगळी बोलीभाषा, नागरी वातावरणापासून अनभिज्ञ अशा विद्यार्थ्यास शिक्षण म्हणजे काय याची काय कल्पना असेल ? मग तो शिक्षणाबाबत उदास राहणार नाही तर काय ? अपयशी विद्यार्थ्यांची फौजची फौज निर्माण होताना दिसते. मग स्पर्धात्मक दृष्टीकोन तर त्यांच्या कित्येक योजने लांबच, इथूनच त्याच्या अध:पतनाची सुरुवात होते. शिक्षकवृंद परिक्षा हॉलमध्ये ढील देतात आणि बोगस निकाल लागतात, संपूर्ण पिढी उध्वस्त होते.

साऱ्या समस्यांवर इलाज आहे. पण त्यासाठी सहकार्याची गरज आहे. आदिवासी विकास योजना राबवणाऱ्या सक्षम अधिकाऱ्यांची गरज आहे. सेवाभावी निस्वार्थी नेतृत्वाची त्याला गरज आहे. तरच त्याचा उद्याचा भविष्यकाळ उज्ज्वल आहे. अन्यथा डोंगरदऱ्या, कड्याकपारीतील हा माणूस असाच अंध:कारात चाचपडत राहिल आणि ह्या माणसाला बघायला 'ते' ताफेच्या ताफे घेऊन येतील म्हणतील,

'अरे ! हा बघा आदिवासी !'

● ● ●

# महादेव कोळी

- रा. वि. भुस्कुटे

कोळी हा फार मोठा समाज आहे. या समाजात बऱ्याच जमातींचा अंतर्भाव होतो. गुजरातच्या उत्तरेकडील वाळवंटापासून रत्नागिरीपर्यंत, तर पुण्याच्या दक्षिणेकडील पंढरपूरापासून पूर्वीच्या निजाम राज्यातील बालाघाट टेकड्यांपर्यंत, उत्तरेला पूर्वीचा विदर्भ प्रांत, कऱ्हाड आणि खानदेश या विस्तीर्ण भूप्रदेशात त्यांच्या वस्त्या आहेत. दख्खन प्रदेश, कोकण व गुजरात मधील जवळ जवळ प्रत्येक गावी कोळी समाज आढळून येतो. डोंगरातूनही मोठ्या कार्यक्षमतेने आणि मेहनतीने शेती करून उत्कृष्ट प्रतीचा भात ते पिकवतात. त्यांच्या सभोवताली वास्तव करणाऱ्या कुणबी शेजाऱ्यांसारखीच त्यांची भाषा रूढी व पेहेराव असतो. एवढेच नाही तर त्यांच्यासारखेच साधारणत: ते दिसतात. यावरून असे अनुमान निघते की रजपूत या भागात येण्यापूर्वी त्यांचाच वरचष्मा या भागात होता. त्यांच्यातील वरच्या थरातील भूधारकांमध्ये असलेली चव्हाण, पवार आणि जाधव ही आडनावे असे दर्शवितात की त्यांच्यामध्ये रजपूत रक्ताचा काही अंश असावा.

### वेगवेगळ्या बारा जमाती

कोळी समाज बारा वेगवेगळ्या जमातीमध्ये विभागला गेला आहे. या बारा जमाती खालील प्रमाणे आहेत.

१) बाद २) चाची ३) ढोर म्हणजे टोकरे ४) डोंगरी ५) खार ६) महादेव ७) मल्हार म्हणजे चमली कुनाम आणि पानभरी ८) माखी ९) मेटा म्हणजेच धनगिरी, राज, मेन १०) सालसी म्हणजेच काष्टी ११) लल्लन गुटी आणि १२) ठाणकर

काठेवाड मधील जुनागड मधून कोळी जमात आली असे मानण्यात येते. हा समाज शिस्तीत राहणारा व मेहनती आहे. शेती मजूरी आणि सेवा व्यवसायात हे आढळून येतात. ठाकूर आणि महालक्ष्मीची ते पूजा करतात.

### धाडसी व स्वतंत्र बाण्याचे महादेव कोळी

कोळ्यांमध्ये महादेव कोळी प्रसिद्ध आहेत. तेराव्या शतकाच्या शेवटी शेवटी त्यांनी कोकणात प्रवेश केला असे दिसते. कदाचित मुस्लीम आक्रमणामुळे त्या काळात झालेल्या मोठ्या प्रमाणावरील स्थलांतरणामुळे त्यांचे कोकणातील हे आगमन झाले असण्याची शक्यता आहे. महादेव कोळी ही जमात ठाणे जिल्हयातील शहापूर, मुरबाड, कर्जत, वाडा पूर्वीच्या जव्हार संस्थानात म्हणजे सध्याच्या जव्हार तालुक्यात प्रामुख्याने आढळून येते. पनवेल, कल्याण, भिवंडी, तालुक्यातही ते थोड्या प्रमाणात आहेत. ठाणे जिल्हयाच्या सरहद्दीवरील सह्याद्रीच्या रांगांमध्ये, अहमदनगर, पुणे, नाशिक जिल्हयात या जमातींची बऱ्यापैकी वस्ती आहे. १९९१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील महादेव कोळी समाजाची एकूण लोकसंख्या ७,८७,४४८ आहे. महाराष्ट्रातील विभिन्न आदिवासी समाजातील लोकसंख्येनी जास्त असलेल्या ज्या जमाती आहे त्यामध्ये गोंड ११,६२,७३५, भिल्ल ९,९३,०७४ या खालोखाल महादेव कोळी जमात ही तिसऱ्या क्रमांकावर आहे. महादेव कोळी समाज स्वत:ला उच्चवर्णीय समजतो. त्यामुळे या समाजामध्ये स्त्रिया घराबाहेर सहसा पडत नाहीत. पडद्यामध्येही काही असतात. या

समाजामध्ये स्त्रियांबद्दलच्या दृष्टिकोन सरंजामी आणि मागासलेला असल्याने स्त्रियांमधील सुशिक्षिततेचे प्रमाण पुरुषांमधील सुशिक्षिततेच्या (५३.३०%) टक्केवारीच्या निम्मे देखिल नाही. म्हणजे अवघे (२३.७२%) टक्के आहे. मराठ्या इतके ते मजबूत आणि धट्टे कट्टे नसले तरी घाटांवरील लोकांपासून फार भिन्न वाटत नाहीत. तसेच वारली जमातीच्या लोकांच्या तुलनेत ते ताकदीमध्ये आणि दिसण्यात सरस असतात. पूर्वीच्या काळात त्यांच्यापैकी काही स्वातंत्र्यावर उत्कृष्ट प्रेम करणारे भलतेच धाडसी व स्वतंत्र बाण्याचे होते.

### बालाघाट व महादेव टेकड्यांमध्ये मूळ वास्तव्य

मॅकीनटोश या इतिहास तज्ञांच्या म्हणण्याप्रमाणे निझामच्या हैद्राबाद संस्थानची पश्चिम हद्दीवरील बालाघाट आणि महादेव टेकड्या येथे महादेव कोळी समाजाचे मुळ वास्तव्य होते. त्यांचे असेही प्रतिपादन आहे की, पुणे जिल्हयातील घोडनदी काठी ते प्रथम येऊन स्थिरावले. येथून कालांतराने उत्तर आणि पश्चिम कोकणात त्यांनी प्रवेश केला. गारसी, संपती आणि गवळी ही घराणी हल्ला करून त्यांनी नाहिशी तरी केली किंवा स्वतःमध्ये समाविष्ट करून घेतली. असे देखिल मानण्यात येते की, त्यांच्या मुळ वास्तव्याच्या इतिहासाचा सबळ पुरावा म्हणजे पूर्वी ते लिंगायत होते. त्यांच्या मधील लग्न, अंत्यविधी वगैरे विधी राऊळ गोसाव्यांकडून करून घेतले जात असत. सुमारे दीडशे वर्षापूर्वी पेशवाईमध्ये महादेव कोळी समाजाने ब्राम्हणाच्या वर्चस्वाचा स्विकार केला. धार्मिक विधी, लग्न, अंत्यविधी वगैरे पुण्याहून पेशव्यांनी पाठविलेल्या ब्राम्हणांकडून ते करून घेऊ लागले आणि अशा प्रकारे राऊळ गोसाव्यांची हाकलपट्टी झाली.

### २४ घराणी आणि २८७ उपघराणी

मॅकीनटोशच्या संशोधनाप्रमाणे महादेव कोळी ही जमात २४ घराण्यांमध्ये विभागलेली आहे. कालांतराने या प्रत्येक घराण्यामध्ये उपघराणी निर्माण झाली. ही २४ घराणी व त्यांची एकूण २८७ उपघराणी आहेत. ती खालील प्रमाणे.

(१) वंकपाल १७, (२) कदम १६, (३) पवार १३, (४) केदार १५, (५) दुर्दावंत १७, (६) नामदेव १५, (७) क्षिरसागर १५, (८) भोसले १६, (९) भागविंत १४, (१०) भोलेवास १२, (११) आरचा १३, (१२) दलवी १४, (१३) अघाशी ३, (१४) चव्हाण ३, (१५) गवळी २, (१६) दोजाई १२, (१७) सागर १२, (१८) इगताब १३, (१९) गायकवाड १२, (२०) सुर्यवंशी ११, (२१) खराड ११, (२२) सिरखी २, (२३) सिल २, (२४) मुस्लीम संत शेकसा, शेशा व त्यांची १२.

युद्धामुळे किंवा खाजगी भांडणांमुळे स्वतःच्या लोकांपासून दूर जाऊन डोंगरामध्ये आश्रय घेतलेल्या उच्च जातीच्या पुढारी व्यक्तींनी या घराण्यांची स्थापना केली असा इतिहास तज्ञ मॅकीनटोशचे मत आहे. परंतु वरीलपैकी कदम, पवार, भोसले आणि अन्य घराणी ही मुळची रजपूत असण्याचा अधिक संभव आहे. परंतु या घराण्यांमध्ये अंशतः तरी दक्षिणेचे रक्त आहे. असा निष्कर्ष मॅकिनटोशने काढलेला आहे. त्यांनी असेही दृष्टिपत्तीस आणून दिले आहे की, पश्चिमेला डोंगराळ भाग कमी असलेल्या जुन्नरकडे महादेव कोळी हे खाण्यापिण्याच्या बाबतीत कुणब्यांसारखेच आहेत. दोघांचा दर्जा साधारणतः सारखा आहे. परंतु मुस्लिम इतिहास तज्ञ महादेव कोळ्यांना मराठा म्हणून संबोधतात, शिवाजीच्या काळापूर्वीपासून मराठे आणि महादेव कोळी

यांच्यामध्ये आंतर जातीय विवाहाची पद्धती रूढ होती. अजूनही असे विवाह होत असतात.

### मूळचे लिंगायत

महादेव कोळी हे वर उल्लेख केल्याप्रमारे मुळचे लिंगायत होते आणि अठराव्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत ब्राम्हणाचे वर्चस्वाचा स्विकार करीपर्यंत राऊळ गोसावी त्यांचे पौराहित्य करत असत. हिंदुच्या सामान्य देव देवतांना ते पुजतात परंतु त्यांचे मुख्य दैवत महादेव म्हणजे खंडोबा हे आहे. दक्षिणेतील जेजुरी व भिमाशंकर ही खंडोबाची प्रमुख देवालये आहेत. भैरू, भवानी, हिरोबा, आणि खंडोबा या त्यांच्या घरातील देव देवता आहेत. मुसलमान संताच्या दर्ग्याला ते भक्तीभावाने भेट देतात, नवस बोलतात, चादर चढवतात तसेच ज्या वीरपुरुषांना युध्दाच्या धुमश्चक्रीमध्ये विराचे किंवा हिंसक मरण आले आहे त्यांच्या आत्म्याच्या पवित्र स्मृतींना आदरांजली वाहतात.

### वैशिष्टचपूर्ण गोतराणी न्यायमंडळ

ब्राम्हणाच्या वर्चस्वाखाली येण्या पूर्वीच्या काळामध्ये जमातीमधील, सामाजिक तंटयाचे निवारण करणे, नीतीबाहय वर्तन, किंवा जात नियमांचा भंग करणारांना शिक्षा ठोठाविण्यासाठी महादेव कोळी जमातीची ''गोतराणी'' म्हणून ओळखली जाणारी न्याय मंडळ व्यवस्था होती. ही पध्दती वैशिष्टचपूर्ण आणि आगळी वेगळी आहे. न्यायदान मंडळाचे सहा सदस्य असत १) अध्यक्ष किंवा रंगतवान २) उपाध्यक्ष किंवा मेतल ३) हवालदार किंवा सबलाह, ४) दंडूका किंवा धालिया ५) मृत गाईचे हाड किंवा हाडकिया आणि ६) मातीचे भांडे किंवा मडके हे सहा सदस्य पिढीजात वंशपरंपरेने असत. जमाकी प्रमुख कोळी नाईक जो पूर्वी जुन्नरला रहात असे त्यांच्या अधिकाराखाली ते काम करीत असत. रोश घराण्यातला या न्यायमंडळाचा अध्यक्ष असे तो प्रमुख कोळी नाईकाशी सल्लामसलत करून नियमाचा भंग करणाऱ्यांवर फिर्याद दाखल करत असे, अध्यक्ष किंवा रंगतवान बरोबर एका थाळीत एकत्र जेवण घेत नाही तोपर्यंत त्या गुन्हेगार व्यक्तीला जातीमध्ये पुन्हा प्रवेश दिला जात नसे. उपाध्यक्ष किंवा मेतल हा केदार घराण्यातला असे. तो रंगतवानाला किंवा अध्यक्षाला सहाय्य करत असे. अध्यक्षाच्या गैरहजेरीत अध्यक्ष म्हणून काम पहात असे. हवालदार किंवा सबलाह हा क्षिरसागर घराण्यातला असे तो गावागावातून फिरत असे. लोकांच्या वागणूकीवर लक्ष देऊन चौकशी करून वाईट नीतीमत्तेच्या अपराध्याला पकडून अध्यक्षाच्या हवाली करत असे. दंडा किंवा धालिया हा केदार घराण्यातला असे. तो न्याय मंडळाच्या निर्णयाचे जो गुन्हेगार पालन करणार नाही, त्याच्या घरापुढे उंबर किंवा जांभळाची फांदी ठेवत असे. मृत गाईचे हाड किंवा हाडकिया हा शेश घराण्यातला असे. तो गुन्हेगाराच्या घराच्या दाराला गाईचे हाड बांधण्याचे काम करी. अशाप्रकारे गुन्हेगाराला जातीबाहेर टाकून बहीष्कृत करण्याची औपचारिक प्रक्रिया पूर्ण केली जात असे. पश्चाताप झालेल्या गुन्हेगाराला पुन्हा जमातीमध्ये प्रवेश दिला जात असे. मातीचे भांडे किंवा मडके हा शेश घराण्याचा असे हा गुन्हेगाराच्या जमात प्रवेशावर देखरेख करत असे. गुन्हेगारानी जमात प्रवेश केला की, त्यांच्या घरातील धान्याची मडकी घेून जात असे. नेहमी केली जाणारी शिक्षा म्हणजे दंड करण्यात येईल. वसूल झालेल्या दंड रक्कमेचा काही हिस्सा न्यायमंडळ सदस्यांना दिला जात असे तर काही हिस्सा गाव मंदिर दुरुस्तीसाठी वापरण्यात येत असे.

## जव्हारचे राजे

कोळी समाजात प्रचलित असलेल्या कथेनुसार उत्तर कोकणाच्या मुबारक खिलबीने १३४७ मध्ये जव्हारची स्थापना केली. परंतु या दंतकथेत बरीच गुढता आहे. परंतु १३४३ मध्ये स्थापिलेली सत्ता स्थिरस्थावर होण्यास काही काळ लागला असण्याचीही शक्यता आहे. चौदाव्या शतकाच्या पपूर्वार्धापर्यंत महादेव कोळी जमातीचा कोकणात प्रवेश झालेला नव्हता. एका संत महात्म्याने पॉपेराह या महादेव कोळी पुढाऱ्याला कोकणात जाऊन जव्हार ताब्यात घेऊन तिथला प्रमुख बनायला सांगितले. त्यावेळी जव्हार वारल्यांच्या ताब्यात होते. संत महात्म्याचा सल्ला मानायला पापेराह तयार झाला. गुजरामध्ये काही वर्षे हिंडल्यावर तो जव्हारच्या राजाकडे गेला. जनावराचे कातडे पसरण्यासाठी लागेल एवढीच जमीन द्यावी अशी त्याने राजाला विनंती केली. वारली राजा कबूल झाला. जेंव्हा जव्हारच्या राजाला आढळून आले की त्याचा सर्व गड कातडी पट्ट्याने व्यापलेला आहे तेंव्हा पॉपेराहचे वर्चस्व त्यांनी मान्य केले. आणि गंभीरगडा सभोवतालचा प्रदेश त्याला बक्षिस दिला. थोड्याच काळामध्ये मुस्लीम राजाचे इमानदार असल्याचे पॉपेराहने सिध्द केले. तेंव्हा त्याला ९ लाख वार्षिक उत्पन्न असलेले २२ किल्ले बक्षिस म्हणून देण्यात आले.

पॉपेराहच्या वंशजानी जव्हारवर बरेच वर्षे राज्य केले. सोळाव्या शतकाच्या प्रारंभाला पोर्तुगिजांचे आगमन होईपर्यंत जव्हार प्रमुखाला काही धोका निर्माण झाला नव्हता. सोळाव्या व सतराव्या शतकात जव्हारच्या प्रमुखाला पोर्तुगीज सतत टरकून होते. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात पेशव्यांनी जव्हारच्या राजाचा सधन मुलुख हिसकावून घेईपर्यंत जव्हारचे राजे चांगलेच सामर्थ्यवान व संपन्न होते. १७६० ते १७६६ च्या दरम्यान पेशव्यांनी जव्हार राज्याच्या सत्तेचे आणि संपत्तीचे बरेच खच्चीकरण केले.

## देशभक्त व शौर्याची परंपरा

महादेव कोळी जमात ही धाडसी स्वतंत्र बाण्याची आणि शौर्याची परंपरा असलेली आहे. कोळी लोकांच्या उठावाचा पहिला उल्लेख सतराव्या शतकाच्या मध्यावर केलेला आढळतो. १७३६ मध्ये अहमदनगरच्या निझामशाहीचा पाडाव झाल्यावर दिल्लीच्या शहाजहान बादशहाचा मंत्री तोडरमलने जमीन प्रत्यक्ष मोजून जमिनीवर महसूल आकारणी करण्याची पध्दती सुरू केली. तेंव्हा प्रत्येक जमीन मोजली जाऊ लागली. कोळ्यांना हे पंसत पडले नाही. त्यांनी त्याविरुध्द उठाव केला.

खेनी नार्सक या कोळी प्रमुखानी मोगलां विरुध्दच्या उठावासाठी आपल्या समाजाला प्रवृत्त केले या उठावाचे त्याने पुढारीपणही केले. सतराव्या शतकाच्या मध्यावर १६४५-४७ या सुरुवातीच्या वर्षामधून तरूण शिवाजीला विजापूरची आदिलशाही आणि दिल्लीच्या मोगला विरुध्द या लढ्यातून यश प्राप्त झाले होते. ते वाट पहात असलेली संधीच जणु कोळ्यांना चालून आली तेंव्हा संबंध कोळ्याच्या मुलुखात मोगलांविरुध्दचा उठाव झाला. हा उठाव मोगल बादशहाला निष्ठूरपणे चिरडून टाकण्यात यशही मिळाले. परंतु त्यानंतर मात्र औरंगजेबाने त्यांच्यावर सवलतींची खैरात केली.

पेशव्यांच्या कारकिर्दीत डोंगरी किल्ले काबीज करण्याच्या कोळ्याच्या कुशलतेची वाखाणणी इतिहासात करण्यात आली असल्याचे आढळून येते. नाशिक जवळचा त्रिंबक किल्ला १७६१ मध्ये मोठ्या शर्थीने कोळ्यांनी काबीज करून घेतला या कामगिरीचे नेतृत्व गमानी भांगरे आणि खेरोजी पट्टीकर यांनी केले

होते. संपत्ती व मुलुख देऊन तेंव्हा त्यांचा सन्मान केला होता. मराठ्यांच्या इतिहासात याची खास नोंद केल्याचे आढळून येते.

मराठेशाहीत १७६० ते १७९८ मध्ये जावजी बोमले, १७७६ मध्ये रामजी भांगरे यांनी पश्चिम अहमदनगर विभागात दरोडेखोरी करून अंशातता निर्माण केली होती.

पेशवाईचा पाडाव झाल्यावर ब्रिटिश राजवटीच्या सुरुवातीच्या कालखंडात १८१९ ते १८२९ मध्ये रामजी भांगरे आणि गोविंदराव खारी यांनी ब्रिटिशांना सळो की पळो करून सोडले होते हे बंड शमते न शमते तोच १८४५ ते १८४८ मध्ये राघोजी भांगरे यांनी अहमदनगर आणि कोकण प्रदेशात बंडाचा झेंडा उभारला. फार मोठ्या प्रमाणावर त्यांनी लुटालूट केल्याचे उल्लेख इतिहासात आढळून येतात. राघोजी भांगरेला ब्रिटिशांनी दगाबाजी करून ठाणे जिल्ह्यात पकडले. २ मे १८४८ ला ठाणे येथील किल्ल्यामध्ये त्याला फाशी दिले. या हुतात्म्याच्या बलिदानाला २ मे १९९८ ला बरोबर १५० वर्षे झाली. तेंव्हा त्या दिवशी त्यांच्या स्मृतीला ठाणे जेलमध्ये जाऊन काही जागृत संघटनांनी नागरिकांनी व त्यांच्या ज्ञातीच्या बांधवांनी श्रध्दांजली वाहिली.

• • •

## वनवासी कल्याण आश्रम

भरतो इथे धर्म पिसाटांचा बाजार
आदिवासींना वनवासी बनविण्याचा
फिजूल छळवाद दुभाषी त्यांची नीती
घाव घालती शकुनी
आदिवासी संस्कृती नागविण्या
धूर्त त्यांचे कावे अनार्य मूळ इथले
आर्य आले मागूनी उध्वस्त
करण्या आदिमा
'वनवासी कल्याण आश्रम' नीती
इथे नाकारतात अस्तित्व
ही पैज अस्मितेची
हा संघर्ष संस्कृतीचा
ही उलाढाल नव्हे सोपी
होता कसे वनवासी
तुम्ही गाफील भुकेपायी
वनसंस्कृती रक्षण्या घे
हाती मशाल आदिवासी

**– सुनील कुमरे**
मूल, जि. चंद्रपूर

# आपली जलसंपत्ती व आरोग्य

*- पुरुषोत्तम आगाशे*

'पाणी' हा प्रत्येक सजीवाच्या जीवनातला अत्यंत आवश्यक असा घटक आहे मग ते पशुपक्षी, प्राणी, झाडे कोणीही असो. पाण्याशिवाय कुठल्याही सजीवाच्या अस्तित्वाची कल्पनाच करता येणार नाही. म्हणूनच पाण्याला 'जीवन' असे यथार्थ नाव पडले आहे.

आपल्या जीवनाचाच भाग बनून राहिलेल्या पाण्याने आपले शरीर देखील व्यापलेले असते. शरीराच्या एकूण वजनाच्या ७०% भाग पाण्याने बनलेला असतो. पाण्यामुळे शरीराचे तपमान संतुलित राखण्यास मदत होते. जर का शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी झाले तर गंभीर आजार उद्‌भवून त्यात मृत्यू देखील ओढवू शकतो. अतिसार/जुलाब, उष्माघात ही त्याचीच उदाहरणे आहेत.

दैनंदिन वापरामध्ये आपल्याला पाण्याचा खूप उपयोग होत असतो. त्यामध्ये स्वयंपाक, वैयक्तिक स्वच्छता, हात धुणे, आंघोळ, कपडे धुणे, भांडी घासणे, घराची स्वच्छता, पशुधनाची स्वच्छता यासारख्या गोष्टींचा समावेश होतो. शेतातील झाडे, पिके, भाजीपाला यासाठी पण पाण्याची आवश्यकता असते. इतकेच काय आपल्याला लागणाऱ्या वीजेच्या निर्मितीसाठी देखील पाण्याचाच वापर केला जातो.

आपल्या भागामध्ये दरवर्षी जून ते सप्टेंबर या चार महिन्याच्या काळात मौसमी पाऊस पडतो. पावसाचे बरेचसे पाणी वाहून जाते तर काही जमिनीत मुरते. पावसाळ्यानंतर नदी, ओढे, झरे वहात असतात. तर तळी व विहिरी भरून जातात. या जलसंपत्तीचाच आपण दैनंदिन गरजेसाठी वापर करत असतो. पिण्याचे पाणी याच जलस्त्रोतातून भरले जाते. म्हणून या जलसंपत्तीची स्वच्छता ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. अशुद्ध पाणी पिल्यास निरनिराळे आजार होऊ शकतात. स्वास्थ्य रक्षणासाठी शुद्ध पाण्याचा पिण्यासाठी वापर करणे अत्यावश्यक आहे.

## शुद्ध पाणी

शुद्ध पाणी म्हणजे काय ? ते कसे ओळखायचे ? असे प्रश्न आपल्याला पडणे सहाजिकच आहे. पाण्यामध्ये पुढील गुणधर्म असणे आवश्यक आहेत. पाण्याची चव चांगली पाहिजे, पाण्याला कुठल्याही प्रकारचा वास अथवा रंग असता कामा नये, तसेच पाणी कुठल्याही रसायनांपासून व विषाणू, जिवाणूंपासून मुक्त असले पाहिजे.

पाण्याला कुठल्याही प्रकारचा वास येत असेल, रंग बदलला असेल, वेगळी चव लागत असे, त्यामध्ये कुठले रसायन अथवा जिवाणू असतील तर असे पाणी पिण्यास अयोग्य समजावे.

## पाणी अशुद्ध कशामुळे होते ?

माणसाच्या (खासकरून आजारी व्यक्तीच्या) शरीरामध्ये काही घातक विषाणू अथवा जिवाणू असतात. हे विषाणू, जिवाणू, लघवी अथवा शौचावाटे शरीराबाहेर टाकले जातात. जर का लघवी, शौच पाण्याबरोबर एकत्र झाले तर पाणी दूषित होते.

## दुषित पाण्यामुळे होणारे आजार

शौचामुळे पाणी प्रदूषित होते. आजारी माणसाच्या शौचामुळे संसर्गजन्य रोग पसरण्यास मदत होते. शौचावाटे बाहेर पडलेले जीवाणू व विषाणू पाण्यात

मिसळून तोंडाद्वारे दुसऱ्या व्यक्तीच्या शरीरात प्रवेश करतात.

दुषित पाणी पिले असता कॉलरा, विषमज्वर, जुलाब, अतिसार, हगवण, काविळ, पोलिओ, जंत तसेच खरूज यासारखे संसर्गजन्य रोग होतात. हे आजार होण्याचे प्रमाण मुलांमध्ये जास्त असते. जुलाब/अतिसार, विषमज्वर यासारख्या आजारावर वेळीच उपचार न केल्यास त्याचे गंभीर परिणाम होऊन रुग्ण दगावण्याची शक्यता असते. पोलिओमुळे कायमचे अपंगत्व येते.

असे संसर्गजन्य आजार उद्‌भवल्यावर त्यावर उपचार करण्यापेक्षा आजार होऊ नयेत म्हणून खबरदारी घेणे अधिक चांगले असते. त्यासाठी आपल्या जलसंपत्तीची स्वच्छता त्याचबरोबर पर्यावरणाची स्वच्छता देखील राखणे आवश्यक आहेत.

### गावचा पाणीपुरवठा

वर्षानुवर्षे ओहोळ, नद्या, नाले, तळी, झरे, विहिरी या पाण्याच्या स्त्रोतामधूनच गावाला पाणी पुरवठा होत आलेला आहे. गेल्या काही वर्षामध्ये हातपंप व नळ पाणीपुरवठा योजनेतून गावांना पाणीपुरवठा केला जात आहे. मात्र या सुविधा सर्व गावांमध्ये उपलब्ध नाहीत.

ओहोळ, नद्या, झरे व विहिरी अशा विविध स्त्रोतांमधून गावाला पाणी पुरवठा बारमाही होईलच असे नाही. काही झरे, ओहोळ, विहिरी तसेच नद्यादेखील उन्हाळ्यामध्ये आटतात. अशा वेळेस नदीच्या पात्रात खड्डे खणून त्यातून पाणी भरले जाते. काही दुष्काळग्रस्त गावांमध्ये उन्हाळ्यात टँकरने पाणीपुरवठा केला जातो.

### शुद्‌ध पाणीपुरवठा

पाण्याचे शुद्‌धीकरण करून तसेच पर्यावरणाची स्वच्छता राखून पिण्याचे पाणी स्वच्छ राखता येते.

**पाण्याचे शुद्‌धीकरण** - पाण्याचे शुद्‌धीकरण मोठ्या तसेच लहान पातळीवर करता येते. मोठ्या प्रमाणावर पाण्याचे शुद्‌धीकरण गावपातळीवर करता येते. येथे समाज व ग्रामपंचायतीवर जबाबदारी असते. तर लहान प्रमाणावर शुद्‌धीकरण घराच्या पातळीवर करता येते. त्यासाठी घरातील व्यक्ती महत्वाची जबाबदारी बजावू शकतात.

पाण्याचा स्त्रोत कुठलाही असला तरी पाण्याची शुद्‌धता राखणे आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. आपल्या जलसंपत्तीची योग्य प्रकारे निगा राखून पाण्यावाटे फैलावणाऱ्या आजारांपासून मुक्ती मिळवून सार्वजनिक आरोग्य सुधारण्यास आपण सर्वांनी हातभार लावला पाहिजे.

### जलसंपत्तीची स्वच्छता

नदी, तळी, विहिरी या जलस्त्रोतांचा वापर पिण्याच्या पाण्यासाठी केला जातो. या जलसंपत्तीची स्वच्छता पुढील प्रकारे ठेवता येईल.

**नदी :**

१. नदीच्या पाण्यामध्ये सांडपाणी मिसळून व कचरा पडून होणारे प्रदूषण टाळले पाहिजे.
२. नदीमध्ये मासे, कासवे यासारखे जलचर प्राणी सोडून नदी स्वच्छ राखता येते.
३. नदीच्या पाण्यामध्ये आंघोळ करणे, जनावरे धुणे तसेच काठावर कपडे धुणे, भांडी घासणे यासारख्या पाणी प्रदूषित करणाऱ्या गोष्टींना प्रतिबंध केला पाहिजे.
४. लोकांचे सहकार्य मिळवण्यासाठी त्यांना लोकशिक्षण दिले पाहिजे.

**तळी :** सूर्यप्रकाश व पाण्याची साठवण यामुळे तळ्यातील पाणी स्वच्छ होतेच, याशिवाय पुढील उपाय सहाय्यभूत ठरतील.

१. तळ्याभोवती तारेचे कुंपण घालून जनावरांना प्रतिबंध केला पाहिजे.

२. तळ्यामध्ये सांडपाण्यापासून प्रदूषण होऊ नये म्हणून काठ बांधून घेतले पाहिजेत.

३. कुठल्याही माणसाला तळ्याच्या पाण्यात उतरण्यास प्रतिबंध केला पाहिजे.

४. तळ्यातून पाणी काढण्यासाठी लोकांना सोयीचे जावे म्हणून घाट बांधावा.

५. तळ्यामधील जलपर्णी व अन्य वनस्पती वेळोवेळी काढून टाकल्या पाहिजेत.

**विहिरी :** बहुतेक गावांमध्ये विहिर हाच पाण्याचा मुख्य स्त्रोत असतो. विहिरीचे पाणी स्वच्छ राखण्यासाठी पुढील काळजी घ्यावी.

१. विहिरीच्या भिंत आतून व जमिनीच्या वर ३ ते ४ फूट दगडाने बांधून घ्यावी.

२. जमिनीपासून दोन फूट उंच उंचीचा चौथरा विहिरीच्या बाजूने बांधावा व त्यावर फरशी घालावी. त्यामुळे विहिरीच्या आजूबाजूला दलदल निर्माण होणार नाही.

३. विहिरीजवळ साचलेल्या सांडपाण्याचा निचरा करण्यासाठी गटारे बांधावीत.

४. पाणी काढण्यापुरती जागा मोकळी ठेवून शक्य असल्यास विहिरीचा उरलेला भाग झाकून टाकावा म्हणजे विहिरीत केरकचरा पडणार नाही.

५. विहिरीपासून १५ मीटर अंतरापर्यंत आंघोळ, धुणी भांडी यासारख्या गोष्टींना मज्जाव करावा.

**हातपंप :** विहिरीप्रमाणेच हातपंपाच्या आजूबाजूला परिसर बांधून घ्यावा. पाण्याचा निचरा करण्यासाठी गटारे काढावीत. हातपंपाजवळ आंघोळ, धुणीभांडी या गोष्टींना मज्जाव करावा. हातपंपाची नियमितपणे निगा राखणे व बिघाड झाल्यास त्वरित दुरुस्ती करून घेणे महत्वाचे आहे.

**पाणी शुद्धीकरणाच्या पद्धती**

**पाण्याची साठवण** - पाण्याची साठवण केवळ २४ तास केली असता त्यातील ९०% घाण, बारीक पदार्थ पाण्याच्या तळाशी बसतात व पाणी स्वच्छ होते. पाणी जर का ५ ते ७ दिवस साठवून ठेवले तर त्यातील ९०% जीवाणू मरतात. अशा प्रकारे पाणी साठवल्याने देखील पाण्याच्या शुद्धीकरणास मदत होते. नदीचे पाणी एखाद्या हौदात साठवून मग त्याचा वापर करता येऊ शकतो. छोट्या बंधाऱ्यामुळे देखील पाण्यातील गाळ खाली बसण्यास मदत होते.

घरामध्ये हंडा, माठ, कळशी यामध्ये पाणी २ दिवस साठवले तर त्यातील सर्व गाळ खाली बसतो. तांब्याच्या घागरीमध्ये २ दिवस पाणी साठवले तर त्यातील १००% जीवाणू मरतात तर पितळ्याच्या घागरीतील ९९% जीवाणू मरतात, असे संशोधनाने सिध्द झाले आहे. म्हणून पाणी साठवण्यासाठी तांबे किंवा पितळ्याच्या भांड्यांचा वापर करावा. मात्र त्यातील पाणी दोन दिवस तसेच स्थिर राहू द्यावे.

**तुरटी फिरवणे** - पाण्यातील गाळ खाली बसण्यासाठी तुरटीचा वापर केला जातो. खासकरून पावसाळ्यामध्ये पाणी अत्यंत गढूळ असते अशावेळेस पाण्यातील गाळ खाली बसवण्यासाठी पाण्यामध्ये तुरटी फिरवण्याची प्रथा आहे.

**पाणी गाळणे** - शुद्धीकरणाच्या प्रक्रियेमध्ये पाणी गाळण्याची प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची आहे. वाळूच्या वेगवेगळ्या आकाराच्या कणांच्या थरातून पाणी गाळले असता त्यातील गाळ, जीवाणू तसेच त्याचा रंग, चव नाहीशी होण्यास मदत होते. घरगुती वापरासाठी पाणी कपड्यातून गाळून घेण्याची पध्दत आहे.

**पाणी उकळणे** - पाणी शुद्ध करण्यासाठी पाणी उकळणे ही अत्यंत चांगली पद्धत आहे. पाणी १५-२० मिनिटे उकळले असता त्यातील सर्व जीवाणू मरतात. असे पाणी पिण्यात अत्यंत योग्य असते. मात्र उकळलेले पाणी वापरताना स्वच्छता राखणे जरुरीचे असते. नाहीतर पाणी पुन्हा अशुद्ध होण्याचा धोका असतो. पाणी शुद्धीकरणाची ही पध्दत जरी चांगली असली तरी जास्त इंधन लागत असल्याने खर्चिक पण आहे. पावसाळ्यामध्ये मात्र पाण्यामुळे होणाऱ्या आजारांचे प्रमाण जास्त असल्याने ही पध्दत वापरणे श्रेयस्कर आहे.

**टीसीएलचा (ब्लिचिंग पावडर) वापर** - साठवलेल्या पाण्याचे निर्जुंतुकीकरण करण्यासाठी टीसीएल पावडरचा वापर केला जातो. गावच्या विहिरी अथवा तळ्यातील पाणी शुद्ध करण्यासाठी योग्य मात्रेमध्ये टीसीएल पावडर टाकणे आवश्यक आहे. पावडरीची मात्रा कमी झाल्यास पाणी अशुध्द राहते तर पावडर जास्त झाल्यास अशा पाण्यापासून त्रास होण्याचा संभव असतो. टीसीएल पावडर थंड, अंधाऱ्या कोरड्या जागेमध्ये न गंजणाऱ्या डब्यामध्ये झाकून ठेवली पाहिजे.

गावच्या विहिरींमध्ये टाकण्यासाठी म्हणून पंचायत समितीतर्फे ग्रामपंचायतीला टीसीएल पावडरीचा पुरवठा होत असतो. ग्रामपंचायतीच्या शिपायाने नियमितपणे गावातील सर्व विहिरींमध्ये टीसीएल पावडर टाकली पाहिजे. असे होत नसल्यास गावकऱ्यांनी ग्रामपंचायतीकडे अथवा पंचायत समितीकडे तक्रार केली पाहिजे.

घरातील पाण्याच्या शुद्धीकरणासाठी क्लोरीनचा वापर करता येतो. एक घागर किंवा हंड्यासाठी एक थेंब द्रव क्लोरीन अथवा एक गोळी वापरावी. पाण्यामध्ये क्लोरीन टाकल्यानंतर एक तासानंतर पाणी वापरावे. घरातील पाणी शुद्धीकरणासाठी क्लोरीनची मात्रा ठरविताना तज्ज्ञांचा सल्ला घेणे चांगले.

**पर्यावरणाची स्वच्छता** - पर्यावरण स्वच्छ राखले असता पाण्याचे प्रदूषण होत नाही व पुढील संभाव्य आजारांचा धोका टाळता येतो. पर्यावरणाची स्वच्छता सर्व स्तरांवर होणे भरताना, वैयक्तिक, कुटुंब व गाव पातळीवर स्वच्छता राखून आपल्या भोवतालचा परिसर स्वच्छ राखता येतो. तसेच पाण्याचे प्रदूषण न होता पाणी स्वच्छ व शुद्ध ठेवण्यास मदत होते.

**वैयक्तिक स्वच्छता** - वैयक्तिक स्वच्छता राखल्यास जुलाब, अतिसार तसेच खरजेसारखे आजार टाळता येतात. त्यासाठी पुढील गोष्टींची काळजी घेतली पाहिजे. शौचाला जाऊन आल्यानंतर साबणाने किंवा राखेने हात धुणे, अन्न तयार करायच्या व खायच्या आधी हात धुणे, नियमितपणे आंघोळ करणे, कपडे धुणे इत्यादि.

**कुटुंब पातळीवरील स्वच्छता** - घरामध्ये पाणी भरताना विशेष काळजी घेतली पाहिजे. पाणी भरताना स्वच्छ हात धुवून मगच पाणी भरावे, पाण्याची घागर/कळशी/हंडा आतून व बाहेरून स्वच्छ धुवून घ्यावा. पिण्याचे पाणी कपड्याने गाळून घ्यावे. शक्य असल्यास पाण्यासाठी लहान तोंडाच्याच भांड्यांचा वापर करावा. पाणी नेहमी झाकून ठेवावे, पाणी घेताना भांड्यांमध्ये हात न बुडवता दुसऱ्या भांड्याने पाणी काढून घ्यावे

त्याचबरोबर स्वयंपाकघरातील तसेच न्हाणी घरातील पाण्याचा निचरा व्यवस्थित करावा, असे पाणी साठू देऊ नये.

**गावपातळीवरील स्वच्छता** - सार्वजनिक आरोग्य चांगले राखण्यासाठी गावपातळीवरची स्वच्छता अत्यंत महत्वाची आहे. स्वच्छता राखण्यासाठी सर्व गावकऱ्यांचे सहकार्य जरूरीचे असते. गावाच्या स्वच्छतेसाठी पुढील उपाययोजना कराव्यात. शौचासाठी संडासांचाच वापर करावा. आता पंचायत समितीमार्फत संडास बांधण्यासाठी प्रत्येक कुटुंबामागे रू. ३०००/- (रुपये तीन हजार) अनुदान दिले जाते. या योजनेचा गावामध्ये प्रसार करावा. संडासांचा वापर शक्य नसल्यास शौचासाठी पाणवठ्यापासून दूर जावे.

सांडपाण्याचा निचरा करण्यासाठी शोष खड्ड्यांचा वापर करावा किंवा असे पाणी परसबागेत सोडून त्याचा उपयोग झाडांसाठी करावा. गावात कुठेही सांडपाणी साठू देऊ नये. अशा पाण्यावर डास वाढून मलेरिया फैलावण्याचा संभव असतो. कचरा टाकण्यासाठी घरांपासून दूर खड्डा करून त्यातच कचरा टाकावा. गावामध्ये माणसांच्या व जनावरांच्या मलमूत्राचा वापर करून बायो गॅस प्रकल्प उभारणेसुद्धा शक्य आहे. त्यामुळे मलमूत्रामुळे पाणी प्रदूषित होण्याचा धोका तर टळतोच शिवाय वापरण्यासाठी इंधन व खत पण मिळते.

आपले भविष्य आपल्या हातात असते आणि भविष्य घडवण्यासाठी जरूरी असते आरोग्यदायी जीवनाची. संसर्गजन्य रोग सहज टाळता येण्यासारखे असतात मात्र त्यासाठी स्वच्छता राखणे अत्यंत महत्वाचे असते. स्वच्छता राखण्यासाठी हवा असतो पक्का निर्धार. तर मग आजच आपले जीवन सुखी व निरोगी बनवण्यासाठी आपली जलसंपत्ती व पर्यावरण स्वच्छ ठेवण्याचा आपण संकल्प सोडू.

• • •

## महाराणी दुर्गावती

कमलनयनी तू कोमलांगी
भासे सूर्यप्रकाशी तू तेजाची
तुझ्या असिम तेजाने
मुगलांची झोप उडाली
वैधव्य आले तरी
तू जराही खचली नाही
त्या तुझ्याच सामर्थ्याची
गढमंडला देई ग्वाही
ती तुझी अपूर्व धडाडी
नजरेत मोगलांच्या भरली
जणू वेदनेची धडकी
उरात त्यांच्या भरली
तू मर्दानी मंडल्याची
तू तेजाची चकाकी
तुझ्या विराट आयुष्याला
किनार तुझ्या शौर्याची
मज शपथ तव आयुष्याची
त्या अद्भूत वीर बलिदानाची
तुझे आयुष्य झुंजार वादळी
मीही घेणार जात वाऱ्याची
तुझे समर्पित आयुष्य
घेणार आहे मी आज
तुझ्या अतुल पराक्रमाला
माझे लाख लाख प्रणाम.

**- कुसुम अलाम**

# पुस्तक परीक्षण-१

*- डॉ. शौनक कुलकर्णी, सचिन अत्रे*

एज्युकेशनल स्टेटस् ऑफ मुस्लिमस् : प्रॉब्लेमस् प्रॉस्पेक्टस् अँड प्रायोरिटिज् (Educational Status of Muslims : Problems Prospectus and Priorities) हे शेख रहिम मंडल (Sekh Rahim Mondel) यांचे पुस्तक इंटर इंडिया पब्लिकेशन्सने १९९७ मध्ये प्रकाशित केले. एकूण ११ प्रकरणांचा समावेश असलेल्या पुस्तकांचा एकूण गोषवारा पुढीलप्रमाणे.

पुस्तकातील पहिल्या प्रकरणातच लेखकाने शिक्षणाची गरज मांडली असून, वेगवेगळ्या राज्यातील मुस्लिमांचे प्रमाण आणि शैक्षणिक समस्या मांडल्या आहेत तसेच, परंपरावादी, दैववादी मुस्लिम समाजावरील मानसिक दबाव, असुरक्षितता आणि त्यास अनुसरून संशोधनाची निकड लेखकाने समर्पक शब्दात दिली आहे.

मुस्लिमांच्या शैक्षणिक स्थितीवर संशोधनाची गरज प्रतिपादन केली आहे. कोणत्याही सामाजिक, सांस्कृतिक संशोधनासाठी लागणारी शास्त्रीय पध्दत येथे लेखकाने दिली आहे. एकूण प्रकरणातून लेखकाची मुस्लिम समाजाविषयीची तळमळ दिसून येते. दुसऱ्या प्रकरणात इस्लाम शिक्षण आणि परंपरांचा विचार केला आहे. परंपराप्रिय मुस्लिम समाजाची वागणूक इस्लामच्या तत्वानुसार आहे. अल्लाह, नमाज (प्रार्थना), रमजान (उपवास), झाकत व मक्केची यात्रा ही इस्लामची पायाभूत तत्वे आहेत. कुराण आणि हादिथ (परंपरा) हे मार्गदर्शक स्त्रोत आहेत. व्यक्तिमत्व विकासासाठी शिक्षणाची गरज इस्लाम मध्ये नमूद केली आहे. अशा या इस्लामचा अरेबियामध्ये इ.स. ५७० मध्ये उगम झाला. महंमदाने स्थापन केलेल्या या पंथाचे शिया आणि सुन्नी असे उपपंथ पडले. या ठिकाणी भारतातील आणि प्रामुख्याने बंगालमधील इस्लामच्या प्रसाराचा आढावा घेतला आहे. धर्म आणि मुस्लिम समाजाचे मोजक्या शब्दात मांडलेले नाते प्रशंसनीय आहे.

तिसऱ्या प्रकरणात भारतातील मुस्लिम समाज मागास रहाण्याची कारणे लेखकाने मांडली आहेत, त्यामध्ये दैववादी वृत्ती आणि रुढीप्रियता लेखकाने विशेषत्वाने नमूद केली आहे आणि याचा शिक्षणाशी येणारा थेट संबंध दाखविला आहे. चौथ्या प्रकरणात बंगालातील मुस्लिम समाजाचा वसाहतयुगाच्या पूर्वीचा, वसाहत युगातील आणि वसाहतयुगा नंतरच्या शिक्षण परिस्थितीवर विचार केला आहे. येथे मुस्लिम समाज शिक्षणापासून का वंचित राहिला याची मिमांसा केली आहे. पाचव्या प्रकरणात तत्कालिन बंगालमधील मुस्लिमांच्या सामाजिक स्थितीचा विचार केला आहे. मात्र हा अभ्यास प्रामुख्याने बंगाल पुरताच मर्यादित आहे. बहुपत्नित्वाची पध्दत हे मुस्लिमांचे वैशिष्ठ्य असले तरी बंगालमध्ये त्याचे प्रमाण खूपच कमी म्हणजे (३%) पेक्षा कमी असल्याचे आणि घटस्फोटांचे प्रमाणही खूप कमी असल्याचे नमूद केले आहे. या समाजातील निराशाजनक शिक्षणस्थितीचे म्हणजे ५१% पुरुषांचे, ३०% स्त्रियांचे आणि ४०% एकत्रित साक्षरतेचे प्रमाण दाखवून राष्ट्रीय साक्षरतेपेक्षा साक्षरतेचे प्रमाण कमी असलेल्या जिल्हयांची यादी दर्शविलेली आहे. या प्रकरणात मुस्लिम समाजव्यवस्थेचा, मुस्लिम मनाच्या पार्श्वभूमीचा आणि लोकांच्या दृष्टिकोनाचा

लेखकाने बारकाईने अभ्यास केला आहे. सहाव्या प्रकरणात लेखकाने संशोधनासाठी निवडलेली गावे आणि लोकसंख्या यांचा आढावा घेतला आहे. प्रमुख शहरांपासूनची अंतरे, व्यवसाय, समाजरचना, तुलनात्मक साक्षरतेचे प्रमाण, समाजरचना, विवाहाचे वय, शैक्षणिक स्थिती यांची माहिती तक्तारुपाने दिली आहे. मात्र संपूर्ण संशोधन हे बंगालमधील सहा जिल्हयातच झालेले असून सर्व निष्कर्ष हे त्यावर आधारित आहेत. शिवाय ही ठिकाणे नकाशारूपाने दाखविली असती तर ते प्रभावी ठरू शकले असते.

सातव्या प्रकरणात गावातील शैक्षणिक सुविधा, शाळेची इमारत, बांधकाम, शाळांचे अंतर आणि त्यांच्या कार्यप्रणालीबद्दल माहिती दिली आहे. मकतान (प्राथमिक शाळा), खारेजी मदरशा (माध्यमिक शाळा) आणि उच्च शिक्षण केंद्रे याविषयीही माहिती येथे दिली आहे. आठव्या प्रकरणात मुस्लिम गावकऱ्यांची शैक्षणिक स्थिती दाखविली आहे. येथे साक्षरतेनुसार लोकांची गटवार विभागणी दिली आहे. शाळा मध्येच सोडून देणारे, नापास होऊन त्याच वर्गात रहाणारे, गैरहजर रहाणारे विद्यार्थी आणि त्यांची शैक्षणिक स्थिती, मुलांचे अनुभव, पालकांची वागणूक, पालकांच्या शिक्षणाचा मुलांवर होणारा परिणाम, मुलांच्या शिक्षणात पालकांना येणाऱ्या समस्या याचा उहापोह केला आहे.

नववे प्रकरण हे धार्मिक आणि अनौपचारिक (अभ्यासक्रमाव्यतिरिक्त) शिक्षण असे असून येथे लेखकाने इस्लामच्या अनुसार शिक्षणाचे महत्त्व प्रतिपादन केले आहे. धार्मिक शिक्षणाची म्हणजे अर्थ समजून न घेता केवळ वाचनाच्या शिक्षणाची स्थिती तक्त्यातून दाखविली आहे. कोणत्याही समाजात धर्माचे स्थान महत्त्वाचे असते. मुस्लिम समाजाचे मूळ इस्लाम आहे. इस्लाम आणि कुराण यांचे स्थान समाजात किती महत्त्वाचे आहे हे लेखकाने स्पष्ट केले आहे. संशोधनाअंती मिळालेल्या निरीक्षणात असे दिसून येते की स्त्रीशिक्षणास विरोध आणि शिक्षण म्हणजे व्यर्थ खर्च अशी भावना अजूनही मुस्लिमात दिसून येते.

दहावे प्रकरण हे मुस्लिम स्त्रिया व शिक्षणविषयक असून, भारतातील मुस्लिम स्त्रियांची पूर्वीची व आत्ताची शैक्षणिक स्थिती, साक्षरता प्रमाण यांची माहिती दिली आहे. उच्चशिक्षण न घेण्याची कारणे दिली असून, सहाही खेड्यातील मुस्लिम स्त्रियांची शैक्षणिक स्थिती निराशाजनक दिसते. येथे प्रस्तुत संशोधन प्रशंसनीय आहे पण मुस्लिमांची शैक्षणिक स्थिती सुधारण्यासाठी समाजाच्या विचारसरणी विषयी काही मुद्दे मांडले असते तर अभ्यास अधिक परिणामकारक झाला असता. शेवटचे प्रकरण हे अडचणी, संधी आणि प्राधान्य असे असून पुस्तकाचा साररूपाने अभ्यास आहे. निरक्षरता, उच्चशिक्षण, धार्मिक शिक्षण, स्त्रीशिक्षण यातील प्रश्न व अडचणींचा विस्तृत आढावा येथे घेतला आहे. तसेच मुस्लिांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी एक योजना/प्रस्ताव मांडला आहे. लेखकाने पुस्तकरूपाने पुढे आणलेले हे संशोधन मुस्लिम समाजाची शैक्षणिक प्रगती साधण्याच्या कामी निश्चित उपयोगी ठरेल.

**पुस्तक :**

**Educational Status of Muslims Problems, Prospectus & Priorities**

**लेखक :** शेख रहिम मंडल

इंटर इंडिया प्रकाशन १९९७

**पृष्ठे :** २६४

**किंमत :** ३३५ रूपये

● ● ●

# पुस्तक परीक्षण-२

*- सुरूची पांडे*

'संत मुंगशुजी : एक कृतिशील तपस्वी' हे पुस्तक वाचल्यानंतर एका अपरिचित संत लेखकाबद्दल वाचकाला निश्चितच नवीन माहिती मिळते. साधारणपणे संत साहित्याबद्दल ज्याला किमान आस्था आहे अशा माणसाची उडीही ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास अशा ठळक नावांपलिकडे जात नाही. अशा परिस्थितीत 'संत मुंगशुजी' हे नाव आपल्या कधी कानावर तरी पडू शकते की नाही अशी शंका असताना डॉ. तुमराम यांनी हे परिचयात्मक पुस्तक लिहून नक्कीच मोलाचे काम केले आहे, असे म्हणता येईल. डॉ. तुमराम हे पदार्थ विज्ञान या विषयाचे प्राध्यापक आणि आदिवासी जीवनाशी जवळून परिचित आहेत. त्यामुळे त्यांचे लिहिणे हे पूर्णपणे तिऱ्हाईत दृष्टिकोनातले राहत नाही.

सहा छोटेखानी प्रकरणांमध्ये पुस्तक विभागले गेले आहे. पहिल्या प्रकरणामध्ये त्यांनी संत साहित्यामागचा हेतु, समाजाच्या दृष्टिने त्याची उपयुक्तता आणि गरज यांची चर्चा केलेली आहे. प्रस्थापित संत साहित्यावरील त्यांनी उल्लेख केलेले आक्षेप सुजाण वाचकाला नक्कीच अस्वस्थ करतात. उदाहरणार्थ - ''महाराष्ट्रीय संत मंडळातील संत रामदास व ज्ञानेश्वर हे दोन उच्चवर्णीय संत होत. त्यामुळे उच्चवर्णीयांची केवळ तरफदारी करणारी वर्णांकीत जाणीवच रामदासांच्या वाङ्मयातून प्रगटली आहे. बहुजनांचा विचार त्यातून वर्ज्य झालेला आहे.'' (पृष्ठ क्र. ४) संत नामदेव, चोखामेळा, बंका, कान्होपात्रा इ. संतांबद्दल बोलताना लेखक म्हणतो, ''संतांच्या वाणीत प्रसंगी आक्रमकता असली तरी कृतीत शिथीलता आणि आचरणातून वर्णाश्रमधर्म व शास्त्रप्रामाण्य यांना मूक संमती होती. ब्राह्मणश्रेष्ठत्वाचा अकारण स्वीकारही त्यात अंतर्भूत होता. --- जातीय विषमतेची झळ सोसूनही संतांनी त्याविरुद्ध आवाज बुलंद केला नाही. विद्रोहाचे शस्त्र उगारले नाही.'' (पृष्ठ क्र. ३) याप्रकारचे आक्षेप सामाजिक दृष्टिकोनातून, सुधारक भूमिकेतून खरे तर आहेतच, पण तेवढेच ग्राहय धरून वाद वाढवायचा की संतसाहित्याला तत्कालिन महत्त्व देऊन त्याचा विचक्षण विचार करायचा ? कारण शेवटी 'अध्यात्म' ही अशी संकल्पना आहे की व्यक्तिनुरुप तिचे स्वरूप बदलते आणि एका मर्यादेपलिकडे आपण चर्चा तापूही शकत नाही.

पुढील २ ते ५ प्रकरणांमध्ये लेखकाने मुंगशुजी यांच्या परिचयाबद्दल, कार्याबद्दल, लेखनाबद्दल माहिती दिलेली आहे. ही माहिती देखील अगदी थोडक्यात, कुठेही पाल्हाळ न लावता दिलेली आहे. मुंगशुजी महाराजांचा जन्म, सांसारिक जीवन, अध्यात्माकडे ते कसे वळले आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे त्यांनी आपले सुधारणावादी विचार आणि समाज यांची सांगड घालण्याचा प्रयत्न कसा केला. ते केवळ आत्मसंतुष्ट न राहता त्यांनी आदिवासींच्या उद्धारासाठी धडपड केली. पृष्ठ क्र. ४५ व ४६ वर त्यांनी मुंगशुजींनी केलेल्या समाजकार्याचा ठळक आलेख दिलेला आहे. दारूबंदी, हुंडाबंदी आणण्यासाठी प्रयत्न, सामाजिक समता आणण्यासाठी धडपड अशा सारखी पावले उचलण्यातच मुंगशुजींचे काळाचे भान दिसते.

सामाजिक बांधिलकीच्या नुसत्या गप्पा ठोकण्याऐवजी त्यांनी आयुष्यभर त्यासाठी काम केले. त्यांच्या लेखनातही या चळवळीचे प्रतिबिंब उमटलेले दिसते, ते असे.

''करा समाजाची एकी लवलाही रे
आता बघण्याची वेळ उरली नाही रे।'' (पृष्ठ क्र. ४८)

अशा संत कार्यकर्त्यांची ओळख करून देण्याचे मोठे काम डॉ. तुमराम यांनी केले आहे. तेही सोप्या शब्दात मुंगशुजींच्या मर्यादाही त्यांनी प्रामाणिकपणे ध्यानात घेतलेल्या दिसतात. त्यामुळे पुस्तक खचितच वाचनीय आहे.

**पुस्तक :- 'संत मुंगशुजी : एक कृतिशील तपस्वी'**

**लेखक :- डॉ. विनायक तुमराम**

**प्रकाशक :-** संजय तुमराम, चंद्रपूर, १९९८

**पृष्ठे :-** ६० (संदर्भा सहीत)

● ● ●

# राष्ट्रीय पर्यावरण जागृती अभियान १९९८-९९

भारत सरकारच्या वन व पर्यावरण मंत्रालयातर्फे लोकांमध्ये पर्यावरणाविषयी जागृती निर्माण व्हावी म्हणून दरवर्षी एक पर्यावरण विषयक संकल्पना घेऊन स्वयंसेवी संस्थांच्या सहाय्याने 'राष्ट्रीय पर्यावरण जागृती अभियान' राबविले जाते. वर्ष १९९८-९९ साठीच्या अभियानाचा विषय होता - 'आपली जलसंपत्ती स्वच्छ ठेवा.'

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेने उत्तर-पश्चिम महाराष्ट्रातील आदिवासींसाठी आत्तापर्यंत अनेक विधायक उपक्रम राबविले आहेत. आदिवासींचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी परिषद नेहमीच प्रयत्नशील राहिली आहे. या प्रयत्नांचाच एक भाग म्हणून वर्ष १९९८-९९ चे राष्ट्रीय पर्यावरण जागृती अभियान ठाणे जिल्ह्यातील चालतवड व दाभेरी (ता. जव्हार) या दोन आदिवासी गावांमध्ये घेण्यात आले. या अभियानाचा हा वृत्तांत.

राष्ट्रीय पर्यावरण जागृती अभियानांतर्गत शाळेतील विद्यार्थ्यांसाठी चित्रकला व निबंध स्पर्धा, पदयात्रा, सार्वजनिक सभा व प्रदर्शन अशा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. जव्हार तालुक्यातील (जि. ठाणे) चालतवड गावात १६, १७ डिसेंबर रोजी तर १८, १९ डिसेंबर १९९८ रोजी दाभेरी गावात हे कार्यक्रम घेण्यात आले.

**चित्रकला व निबंध स्पर्धा -**

शहरी भागातील शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी अनेक संस्थांतर्फे चित्रकला व निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. आदिवासी भागातील शाळांमधून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मात्र असे उपक्रम होताना दिसत नाहीत. आदिवासी विद्यार्थ्यांच्या कला गुणांना व विचारांना वाव मिळावा, संधी मिळावी या हेतूने चित्रकला व निबंध स्पर्धा घेण्यात आल्या. चालतवड व दाभेरी येथील आश्रमशाळातून स्पर्धा घेण्याचे ठरले होते परंतु आयत्यावेळेस तेथील प्राथमिक शाळातील मुलांनादेखील स्पर्धेत सहभागी करून घेण्यात आले. या स्पर्धांना विद्यार्थ्यांकडून उस्फूर्त व भरघोस प्रतिसाद मिळाला. निबंध व चित्राचे विषय विद्यार्थ्यांना आठवडाभर आधी कळवण्यात आले होते. स्पर्धांमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या तक्ता क्र. १ मध्ये दर्शविण्यात आली आहे.



*राष्ट्रीय पर्यावरण जागृती अभियान १९९८-९९ निबंध स्पर्धा, आश्रमशाळा, चालतवड*

तक्ता क्र. १

| शाळा | चित्रकला स्पर्धा | | | निबंध स्पर्धा | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण |
| संत गाडगे महाराज आश्रम शाळा, चालतवड | ३२ | ३२ | ४४ | ४१ | ३ | ४४ |
| जि.प. प्राथमिक व पूर्व माध्यमिक शाळा, चालतवड | २२ | १२ | ३४ | ६ | - | ६ |
| शासकीय आश्रमशाळा, दाभेरी | ५६ | २७ | ८३ | १४ | ७ | २१ |
| जि.प. प्राथमिक शाळा, दाभेरी | ४ | २ | ६ | - | - | - |
| **एकूण** | ११४ | ५३ | १६७ | ६१ | १० | ७१ |

चित्रकला स्पर्धेत एकूण १६७ तर निबंध स्पर्धेत ७१ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. स्पर्धेमध्ये मुलींचा सहभाग अत्यंत कमी होता ही गोष्ट प्रकर्षाने जाणवली.

चित्रकला स्पर्धेसाठी देण्यात आलेले विषय पुढील प्रमाणे -

१) गावातील पाणवठ्याचे दृश्य

२) पाणी शुध्दीकरणाच्या पध्दती

३) पाण्याचे उपयोग

४) पाण्यात खेळणारी मुले

५) पावसाळ्यातील एक दृश्य

पाण्यात खेळणारी मुले, पावसाळ्यातील एक दृश्य हे विषय अत्यंत आवडीचे असल्याने बहुसंख्य मुलांनी या विषयावरच चित्रं काढली होती. विद्यार्थ्यांनी शाळेने दिलेल्या रंगपेट्यातूनच चित्रे रंगवली. चित्रासाठी वापरलेली रंगसंगती अत्यंत आकर्षक होती. स्पर्धेमध्ये भाग घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी अत्यंत संयमितपणे रंगांचा वापर केल्याचे दिसून आले.

विद्यार्थ्यांपैकी विशेष कौतुक करावेसे वाटते ते चालतवड येथील जि. प. शाळेतील विद्यार्थी रविंद्र लाखन आणि राजेश गायकवाड यांचे. या दोघांनीही केवळ पेन्सिलनेच गावच्या पाणवठ्याचे चित्र काढले होते. चित्रामध्ये सर्व बारकावे अतिशय सुरेखपणे दर्शविले होते. त्यावरून त्यांच्या निरीक्षण शक्तीची कल्पना येते. दोघांचेही कौतुक करावे तितके थोडे आहे.

इयत्ता ५ वीच्या पुढील सर्व विद्यार्थ्यांसाठी खुली निबंध स्पर्धा होती. निबंधासाठी पुढील विषय देण्यात आले होते.

१) पाणी आणि आरोग्य

२) गावासाठी शुध्द पाणीपुरवठा कसा करता येईल?

३) पाण्याचे आत्मवृत्त

४) महिला आणि पाण्याचा प्रश्न

५) पाण्याचे दुर्भिक्ष्य झाले तर ....

पाण्याचे आत्मवृत्त व पाण्याचे दुर्भिक्ष्य झाले तर या दोन विषयांवर बहुतेक विद्यार्थ्यांनी निबंध लिहिले. पाणी आणि आरोग्य व गावच्या पाणीपुरवठ्या विषयी थोड्या विद्यार्थ्यांनी तर महिला व पाण्याचा प्रश्न या विषयावर केवळ दोन विद्यार्थीनींनी निबंध लिहिले.

काही निबंधातून शिक्षकांनी सांगितलेल्या वाक्यरचनांची छाप जाणवत होती. मात्र बऱ्याच विद्यार्थ्यांनी स्वत:च्या कल्पनेतून निबंध लिहिलेले दिसले. त्यांना पर्यावरणविषयक जाण असल्याचे निबंधातून प्रतित होत होते. परंतु हे ज्ञान त्यांनी प्रत्यक्ष आचरणात आणले पाहिजे असेही वाटते.

**पदयात्रा, सार्वजनिक सभा, प्रदर्शन :**

दि. १७ डिसेंबर १९९८ रोजी चालतवड गावामध्ये वरील कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. सर्वप्रथम सकाळी ८ वाजता गाडगे महाराज आश्रम शाळेतून सुमारे ३२५ विद्यार्थी व १५ शिक्षक यांच्यासह पदयात्रेला सुरुवात झाली. पदयात्रेत सामील झालेले विद्यार्थी विविध घोषणा देत होते. -

**'पाणी गाळा, रोगराई टाळा',**

**'स्वच्छ करा, स्वच्छ करा,**
**विहिरी तळी स्वच्छ करा'.**

या घोषणांचे फलक विद्यार्थ्यांनी हातातही धरले होते. चालतवड गावाच्या कोपऱ्यावर आल्यावर जिल्हा परिषदेच्या शाळेतील १५० विद्यार्थी व शिक्षक पदयात्रेत सामील झाले. विद्यार्थ्यांचा उत्साह अतिशय वाखाणण्याजोगा होता. पदयात्रेमध्ये जव्हार पंचायत समितीचे उपसभापती श्री. कोळी गुरुजी देखील सहभागी झाले. नंतर पदयात्रा जवळच्याच महाले पाड्यात गेली. तेथे विद्यार्थ्यांनी घोषणा देऊन सारा परिसर दणाणून सोडला. महाले पाड्यावरून प्राथमिक आरोग्य केंद्रावरून पदयात्रा जिल्हा परिषदेच्या शाळेतील पटांगणावर आली तेथे पदयात्रेचे रूपांतर सार्वजनिक सभेमध्ये झाले.

सभेमध्ये श्री. पुरुषोत्तम आगाशे यांनी प्रास्ताविक करून महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेची कार्यक्रम आयोजित करण्यामागची भूमिका मांडली. 'गाडगे महाराज आश्रम शाळेतील शिक्षक श्री. चव्हाण तसेच जव्हार पंचायत समितीचे उपसभापती श्री. कोळी गुरुजी यांनी उपस्थित विद्यार्थी व गावकऱ्यांना जलसंपत्ती स्वच्छ कशी ठेवावी याविषयी मार्गदर्शन केले. त्यानंतर चित्रकला व निबंध स्पर्धेतील प्रथम तीन क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना पारितोषिके कोळी गुरुजींच्या हस्ते देण्यात आली. शाळेच्या आवारातच भित्तीचित्रे व बक्षिसपात्र चित्रांचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. याप्रसंगी परिषदेने तयार केलेल्या 'आपली जलसंपत्ती व आरोग्य' या माहितीपत्रकाचे गावकऱ्यांना वितरण करण्यात आले.

दि. १९ डिसेंबर १९९८ रोजी दाभेरी गावात पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. पदयात्रेमध्ये प्राथमिक शाळेतील ६० व आश्रमशाळेतील २३० विद्यार्थी बँड पथकासह सहभागी झाले होते. दाभेरी गावातून पदयात्रा होळी पाड्यावर जाऊन परत आली. गावाच्या चौकातच सार्वजनिक सभा घेण्यात आली. चित्रकला व निबंध स्पर्धेत यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांना गावचे सरपंच श्री. खुताडे व कोळी गुरुजी यांचे हस्ते पारितोषिके देण्यात आली.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यात अनेकांचे मोलाचे सहकार्य लाभले. त्यामध्ये चालतवड येथील गाडगे महाराज आश्रमशाळेचे शिक्षक श्री. चव्हाण, श्री. महाजन, श्री. सूर्यवंशी, श्री. गमे व इतर शिक्षक वर्ग तसेच जि.प. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. झांबरे बाई, आवारे गुरुजी व इतर शिक्षक, दाभेरी येथील आश्रम शाळेचे मुख्याध्यापक श्री. आवारी व त्यांचे सहकारी शिक्षक यांचा विशेष उल्लेख करावासा वाटतो. विद्यार्थी व गावकऱ्यांनी उस्फूर्तपणे सहभाग घेतला. जव्हार पंचायत समितीचे उपसभापती श्री. कोळी गुरुजी यांनी नेहमीप्रमाणे बहुमोल मदत केली.

# राष्ट्रीय पर्यावरण जागृती अभियान १९९८-९९
## *चित्रकला व निबंध स्पर्धा निकाल*

### १. संत गाडगे महाराज आश्रमशाळा, चालतवड

| चित्रकला स्पर्धा | | | निबंध स्पर्धा | | |
|---|---|---|---|---|---|
| प्रथम क्रमांक | दिपक किसन गावित | इ. ३ री | प्रथम क्रमांक | हरिदास जानू धुळे | इ. १० वी |
| द्वितीय क्रमांक | पंडित परशुराम गांगोडा | इ. ६ वी | द्वितीय क्रमांक | रविंद्र रामचंद्र भामरे | इ. ८ वी |
| तृतीय क्रमांक | कुमुदिनी जगन्नाथ सूर्यवंशी | इ. ५ वी | तृतीय क्रमांक | शीतल दिलीप वाघ | इ. ९ वी |

### २. जिल्हा परिषद शाळा, चालतवड

| चित्रकला स्पर्धा | | | निबंध स्पर्धा | | |
|---|---|---|---|---|---|
| प्रथम क्रमांक | रविंद्र मोहन लाखन | इ. ७ वी | प्रथम क्रमांक | विष्णू रामू गवते | इ. ६ वी |
| द्वितीय क्रमांक | राजेश बबन गायकवाड | इ. ७ वी | | | |
| तृतीय क्रमांक | मधुकर जानु खरपडे | इ. ६ वी | | | |

### ३. शासकीय आश्रम शाळा, दाभेरी

| चित्रकला स्पर्धा | गट १ - पहिली ते चौथी | | गट २ - पाचवी ते सातवी | | |
|---|---|---|---|---|---|
| प्रथम क्रमांक | बाळकृष्ण बुध्या गवते | इ. ४ थी | प्रथम क्रमांक | युवराज विश्राम टोकरे | इ. ५ वी |
| द्वितीय क्रमांक | विलास धर्मेश गवते | इ. ३ री | द्वितीय क्रमांक | सुधाकर घवळू भोये | इ. ५ वी |
| तृतीय क्रमांक | रेखा देवराम कामडी | इ. ४ थी | तृतीय क्रमांक | ईश्वर आरड्या खुताडे | इ. ६ वी |

**निबंध स्पर्धा**

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक | दिलीप धाकल कुरबुडे | इ. ७ वी |
| द्वितीय क्रमांक | मैना धवळू माळगावी | इ. ६ वी |
| तृतीय क्रमांक | जावू शंकर फडवळे | इ. ६ वी |

### ४. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, दाभेरी

**चित्रकला स्पर्धा**

प्रथम क्रमांक रणजित किसन खुताडे इ. ४ थी

# दारूबंदीचे गाणे

### रायसिंग महाराज

या दारूपायी आमचा नाश झाला
या दारूपायी आमचा नाश झाला ॥धृ॥

मंथनातूनी दारू निघाली ।
ती दैत्य लोकांनी प्याली ॥
त्या दारूपायी दैत्याचा नाश झाला ॥१॥

दारू पाजिले शुक्राचार्याला ।
कच याचा घात झाला ।
या दारूपायी दैत्याचा नाश झाला ॥२॥

कलुशाने कावा केला ।
दारू पाजली संभाजीला ॥
दारू पायी संभाजीचा वध झाला ॥३॥

दारू पाजिले आम्हा भिल्लाला ॥
गांव गुंडाने डाव साधिला ॥
या दारूपायी आमचा विनाश झाला ॥४॥

कवी रायसिंग हात जोडीला ।
नका तुम्ही शिवू न दारूला ॥
या दारूपायी आमच्या नाश झाला ॥५॥

जय भारत जय महाराष्ट्र !!!

# आदिवासी भाषेतील दारूबंदी गाणे

दारूनी हकीकत सांगणी पडी
दादा सांगणीपडी
या दारूणी पायरे गळत बुडी ॥धृ॥

मळकाले गोरक्षण दिवी दिना ।
चारशेर गुळ त्यामा टाकी दिना ॥१॥

कळी दोळी आणि रूचकीनणी
साल काढीसनीरे ।
नळसागर त्यामा दिना सोडी ॥२॥

कारभारीनी एकशेरी,
बाई पोऱ्यासनी दोनशेरी,
पाटीलनी देळशेरी,
बघोनावालानी अच्छेरी देनी पडी ॥
या सोबतीना मान माला धरणा पडी
दादा धरणा पडी ॥३॥

सारी दारू गई सरी
त बय आकडा बेरीज करी ।
भांडवल वालाना पैसा फेडी ।
घरमा रातले राहेनात भुक्या पडी ॥४॥

गायक रायसिंग सांगे हात जोडी
दारूना धंदा तुम्ही द्यावे सोडी ।
या शिक्षण अभियानमा टाका
उडी धरणा पोऱ्या शायमा धाडणा
पडीदादा धाडणापडी
या दारूणा पायरे गळत बुडी

जयभिल्ल जय आदिवासी

# आसू ! टिपागड पहाडीतले !!

- उषाकिरण अत्राम

ह्यांनी मरण मरण
आम्हाला धाडलं
आमचं करम करम
ह्यांनी ग कांडलं

काय सांगू बाई कोणा ?
दुःख रानातले सये
कोण बाप, भाऊ होवून
आम्हा छातीसी धरंल

आम्हा नाही खाया घास
पालापाचोळा पांघरूण
राहत्या झोपड्याले नाही
धड कुडाचा आधार

मुळनिवासी आम्ही ग
या धरतीचे राजे
कसून मेहनती घामानं
ह्या मातीले कवटाळलं

आज ठरलोत चोर
आम्हावरी सारे शिरजोर
नक्षलवादी ठरवून माहच्या
नवऱ्याले ग मारलं

संशायी ठरवून माझ्या पोरायले मारलं
एक होता माझा भाऊ, भरदिवसा कापलं
बुढा होता माझा बाप, एका वारात गार केलं
माझ्या जिवाचं जिवाचं कोणीं केलं ग कुरण ?

माझ्या गावातलं लेकरू
भरदिवसाले भेते
रातदिवसा आम्हाले ग
यमलोकच वाटते

माझ्या गावातले आसू
रोज कितीक गळते
त्याले पाहून अभायं
मनी मनीच लाजते गं

नक्षलवादद्याच्या धाकानं
जीणं आमचं हराम केलं
कोठं जावं ? कोण्या गावा
कोण दिशा ? कोण नाव ?

आमच जगणं 'मरण'
रोज डोयानं पाहतो
आम्ही इचाराव कोणा ?
हे जीणं की 'मरण' ?

# माही दुनिया बुडाली !!

- उषा किरण अत्राम

कसी धावतधूपत बय रानाले निघाली
एकएक काडी तीनं जमाजूम केली

यल्लावाकाच्च्या दोरान तीनं मोळी आवरली
एक भल्लामोठा येरू तीनं टेकूचा ठेवला

घामाघूमाने भिजला जीव एडापिसा झाला
बय ! पोटातली भुकं धाप लागली पोटाले

जीव वऱ्यारवाली होये पाणी पाणी जीव बोले
चढण चढली डोंगर ऽ ऽ काट्याकुट्टया वरंपलं

कसं हातापायावरी लाल रगत येरलं
आला नदिचा घाट - येरू टेकला धरीले

मोरी ठेवून कडेले - पाण्यासाठी धाव घेते
तीनं पयसाचे पान - त्याचा डोणा तीनं केला

घट्टाघटा पाणी प्याली - तोंडावर हात वल्ला
नाही पायाले वाहाना - पाय वल्ले तिनं केलं

टेक टेकवून धरी - मोळी डोईवरी घेते
आज इकून मोरी - घरी नेईन जवारी

माझा तापीला भुकीला - घरी आहे उपासी
कशी फिटनं देवा माही गरीबी दिनाली

मन घोड्यापरी धावे - धूईतून पाय धावे
आला गाडीचा गा पुल - रस्ता तीनं पार केला

घासाघासी करून - दहा रुपये गा आले
धावधूपत दुकानी किलोभर पीठ झाले

कशी धूम ठोकत आली वाऱ्याच्या येगानं
महा निजल गा सोनं - तापानं फणफण

तीनं फुटक्या हांडीत तूले आंबील रांधली
हालवून झूलवून - उठ-उठ तवा केली

नाही हालला झूलला - 'जीव कवासा उडाला'
भुकपायी तान्हा माझा 'जीव घेऊन निघाला' !

तीनं टाहो फोडला - माझा सोन्या कुठं गेला ?
एका थेंबासाठी बापा - माय रानाले गा गेली
उठ उठ मह्या सोन्या

● ● ●

## समाज संघर्ष

**- डी. बी. मंडाले गुरुजी**

नवतरूणांनो युवा युवतींनो,
संघटित होऊन पुढे या तुम्ही।
आदिवासी महिला पुरूषांनो
संघवृतीच्या बोध घ्या ध्यानी ॥१॥

तुमच्या सर्वांगीण विकासाला बाधा आणली
प्रस्थापित मतलबी ऐतखाऊंनी।
जलदगतीने पुढे यावे महिलांनी
अंधरूढी भेदभाव झुगारूनी ॥२॥

आदिवासींना मातीत घातले,
डाव साधू शासनांनी।
तुमचा कैवार घेणारा
भारतांत उरला नाही कोणी ॥३॥

आड येणाऱ्या समाज कंटकांना
मातीत घाला तुम्ही।
संघटितपणे, संघर्ष करूनी,
भावी इतिहास लिहा तुमच्या रक्तानी ॥४॥


## निवेदन

**(फॉर्म ४, नियम ८ नुसार)**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रकाशन स्थळ | : | ६४, आनंद पार्क, औंध, पुणे - ४११ ००७. |
| २. | प्रकाशन काळ | : | त्रैमासिक |
| ३. | मुद्रक, प्रकाशक व संपादक | : | रामचंद्र केशव मुटाटकर |
| | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | ६४, आनंद पार्क, औंध, पुणे - ४११ ००७. |
| ४. | स्वामित्व | : | महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद<br>६४, आनंद पार्क, औंध, पुणे - ४११ ००७. |

मी, रा. के. मुटाटकर जाहीर करतो की, वरील तपशील माझ्या माहितीनुसार व समजुतीनुसार खरा आहे.

**रा. के. मुटाटकर**
प्रकाशक

३१ जानेवारी, १९९९

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन, कार्यकर्त्यांचे शिबिराद्वारे प्रशिक्षण.

शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकत्र व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडवून आणणे.

मानव विज्ञान व सामाजिक शास्त्र यांच्या शिक्षकांना व विचारवंताना, मुख्यतः आदिवासींबाबत अभ्यासकांना एकत्र आणणे.

मानव विज्ञानाच्या सर्व शाखांत अध्ययन, संशोधन, प्रकाशन.

या उद्देशाने 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' स्थापन करण्यात आली आहे. याच उद्देशाचे मूर्त स्वरुप म्हणून 'हाकारा' त्रैमासिक सुरु करण्यात आले आहे. परिषदेचे सदस्यत्व स्वीकारुन आपणही या कार्यात सहभागी व्हावे. (संस्थांना फक्त 'हाकारा' चे वार्षिक सदस्यत्व मिळेल)

## मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व

आजीव सभासद ५०० रुपये (फक्त व्यक्तींसाठी)

हाकारा वार्षिक सभासद ५० रुपये (व्यक्ती व संस्था दोन्ही)

परिषदेच्या सभासदांना 'हाकारा' विनामूल्य पाठविला जातो. आपले सदस्यत्व आणि वार्षिक वर्गणी कृपया खालील पत्त्यावर 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' (दि महाराष्ट्र असोसिएशन ऑफ अॅन्थ्रॉपॉजिकल सायन्सेस) यांचे नावे डिमांड ड्राफ्ट अथवा मनी ऑर्डरने पाठवावी. मनीऑर्डर करताना फॉर्ममागे कृपया आपले पूर्ण नाव व पूर्ण पत्ता लिहिण्यास विसरू नये.


**पत्रव्यवहाराचा पत्ता :**

रा. के. मुटाटकर, सचिव
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे - ४११ ००७.

**आपल्या क्रियाशील सहकार्याची अपेक्षा आहे.**

Registered with the Registrar of News Papers of India Under No. 35835/80.

# वर्गणीदारास
# महत्त्वाची सूचना




मनिऑर्डरच्या खालच्या बाजूस मजकूरासाठी असलेला भाग आम्हाला पोस्टाकडून पावती म्हणून मिळतो. बरेच वेळा या पावतीवर पाठविणाऱ्याचे नाव, पत्ता किंवा काहीही मजकूर नसतो. त्यामुळे वर्गणी कोणाची आली, कुठल्या वर्षाची, किती रुपये, पावती कोणाच्या नावाने करून कुठल्या पत्त्यावर पाठवायची हे समजत नाही. वर्गणीदारांची नंतर पावती, अंक न मिळाल्याची तक्रार येते. तरी गैरसोय टाळण्यासाठी वर्गणी पाठविताना मनिऑर्डर फॉर्मवर मजकूर लिहिण्यासाठी असलेल्या जागेत दोन्ही बाजूला आपले संपूर्ण नाव व पत्ता सुस्पष्ट अक्षरात अवश्य लिहावा.

PRINTED BY : ASSIGN SYSTEMS, PUNE 30.